INDIAN SCHOOL OF POLITICAL ECO...

7/10

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणा-या विविध घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

३ ●लक्ष्मीपूजन
७ ●अर्थ्यते इति अर्थः
१३ ●कष्ट करा, स्वयंपूर्ण बना आणि संपत्ती वाटा !
१९ ●सर्व संपत्ती अल्लाहचीच !
२३ ●संपत्तीची उधळण करणारा देव
२७ ●धनलालसा अनिष्ट, धनसंचय नव्हे !
२९ ●अगाध आणि अपार धनमहिमा

◆◆ दीपावली धनविशेष ◆◆

खंड ७ : अंक ७ ऑक्टोबर २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**
**खंड ७ (अंक ७) ऑक्टोबर २००८**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणा-या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*
- **मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन**
- **निवडक साहित्याचे संकलन**
- **संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड**
- **संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# लक्ष्मीपूजन

'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे हितचिंतक आणि वाचकपरिवारातील सर्व लहानथोरांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा. ही दीपावली आणि आगामी नवीन वर्ष आपणा सगळ्यांनाच सुखशांतीचे, समृद्धीचे, भरभराटीचे आणि मुख्य म्हणजे उत्तम आरोग्याचे ठरो, हीच शुभकामना. दिवाळी हा जसा दीपोत्सव तसाच तो धनोत्सवही. धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन आणि बलिप्रतिपदा या तीनही दिवशी आवर्जून आराधना केली जाते ती लक्ष्मीचीच. दिवाळीमध्ये घरीदारी दिवे उजळून दीपोत्सव साजरा करावयाचा तोही भाग्य आणि लक्ष्मी यांची प्राप्ती व्हावी, यासाठीच. भारतीय संस्कृती ही लौकिकापेक्षा पारलौकिकाची आणि प्रेयसापेक्षा श्रेयसाचीच अधिक उपासक आहे, असे म्हटले जाते. इथे अग्रपूजेचा चौरंग हा भोगापेक्षा त्यागाला आणि वैभवापेक्षा वैराग्याला बहाल केला जातो, अशी पारंपरिक धारणा. अर्थात, ही धारणा यथार्थही आहेच. परंतु, म्हणून आमच्या जीवनात लक्ष्मीला स्थानच नाही, असे मात्र मुळीच नाही. प्रत्येक कार्याच्या प्रारंभी प्रेमादरपूर्वक ज्याला आवतण दिले जाते त्या विघ्नहर्त्या विनायकालाही आपण आवाहन करतो ते कार्यस्थळी 'ऋद्धिसिद्धीसहित' विराजमान होण्याचे. यांतील 'ऋद्धी' ही सर्वांगीण भौतिक समृद्धीची, लौकिक संपन्नतेची तर, 'सिद्धी' ही आध्यात्मिक संपदेची, पारलौकिक सामर्थ्याची देवता गणली जाते. याचाच अर्थ हा की, गणाधीश गणनायक हा लौकिक आणि पारलौकिक समृद्धीने मंडित असलेल्या पूर्ण तत्त्वाचे द्योतक, रूपक आहे. गणाधीशाचे पूजन म्हणजे लौकिक आणि पारलौकिक सुखाचा सुवर्णमध्य जीवनात साधलेल्या पूर्णत्वाचे पूजन. लक्ष्मीपूजन करीत असताना आमची भूमिका नेमकी अशीच असते. 'पैसा हेच जीवनातील सर्वस्व' आणि 'मानवी जीवनात पैशाला काहीही किंमत नसते ', या दोन्ही झाल्या टोकाच्या भूमिका. अशा टोकाच्या भूमिका धारण करून जीवनव्यवहार चालत नसतो. व्यष्टी अथवा समष्टी जीवनात लक्ष्मीचे स्थान या दोन टोकांच्या मध्यावर कोठे तरी असते. तसे ते असणे हेच उचित आणि त्याहीपेक्षा स्वाभाविकच ठरते कारण त्याखेरीज जीवनाची धारणाच होणार नाही. आमच्या विचारविश्वातील 'धर्म' ही संकल्पना

बहुआयामी आहे. 'धारण करणे', 'पालनपोषण करणे', 'आधार देणे', 'टिकवणे', 'उचलून धरणे' अशा अनेकानेक अर्थच्छटा तिला जडलेल्या आहेत. एकंदरच जीवनव्यवहाराचे भरणपोषण, लालनपालन हे धनाशिवाय अशक्यच. किंबहुना, 'अर्था'विना 'धर्म' ही संकल्पनाच अर्थहीन ठरावी ! म्हणूनच असेल कदाचित, परंतु, चतुर्विध पुरुषार्थांमध्ये 'धर्मा'च्या मागोमाग दुस-या क्रमांकावर येतो 'अर्थ'. 'धर्मा'ला अनुसरणारा 'अर्थ' आणि 'अर्था'ला अधिष्ठान 'धर्मा'चे, असे हे परस्पराश्रयी नाते. इथे, अर्थाला असलेल्या समष्टीच्या परिमाणाचे भान आपल्याला येते. लौकिक जीवनाचे सातत्य भंग पावू नये यांसाठी आवश्यक असणारी नीतिनियमांची चौकट धर्म जेव्हा सिद्ध करतो तेव्हा, अर्थप्राप्तीइतकाच अर्थार्जनासाठी अवलंबलेल्या मार्गांच्या सूक्तासूक्ततेचा विचारही अगत्याचा ठरतो. नीति-अनीतिच्या संकेतांची बूज राखणे अर्थार्जनाला भाग पडते. अवैध मार्गाने मिळवलेले धन हे विषतुल्य समजावे, असा निःसंदिग्ध सांगावा विष्णुगुप्त चाणक्याने 'अर्थशास्त्रा'मध्ये अडीच हजार वर्षांपूर्वीच शब्दबद्ध करून ठेवावा, यातच सारे काही आले ! धनाच्या वाटपातील विषमताही समाजधारणेस मारकच ठरते. दानधर्माचे अनेकविध धर्मसंस्कृतींमध्ये वर्णिलेले माहात्म्य हे म्हणूनच अनाठायी म्हणता येणार नाही. केवळ भारतीय संस्कृतीतच धनविचाराचे एवढे कंगोरे दृष्टोत्पत्तीस येतात का, हाही एक कुतूहलाचाच प्रांत. अन्य धर्मविश्वांतील धनचिंतन नेमके आहे तरी कसे ? .... नेमक्या याच औत्सुक्याचे शमन करण्याचा प्रयत्न 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रस्तुत दीपावली विशेषांकात केलेला आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# वाचकांचा प्रतिसाद

'**भा**ववाढ नेमकी किती...? कशामुळे ...?' (अर्थबोधपत्रिका पुरवणी, ऑगस्ट २००८) हा लेख वाचला. प्रस्तुत लेख वाचून मनामध्ये जे विचार निर्माण झाले ते या ठिकाणी मांडले आहेत. :

(१) भाववाढीसंदर्भातील चर्चेसाठी औद्योगिक कामगारांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांक आधारभूत धरला आहे. त्या ऐवजी, शेतमजुरांसाठीचा तसेच/अथवा ग्रामीण मजुरांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांक चर्चेसाठी आधारभूत धरणे हे अधिक उचित ठरले असते, असे वाटते. कारण, 'भारत' आणि 'इंडिया' असे जे द्वैत वेळोवेळी चर्चेत येत असते त्यामधील 'भारता'चा भाग ७० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. औद्योगिक कामगारांची टक्केवारी एकूण लोकसंख्येत कितीशी आहे ?

(२) सध्या अनुभवास येत असलेली भाववाढ ही अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेत घट झाल्याने घडणे शक्य आहे, असे विश्लेषण लेखात केलेले आहे. परंतु, असे म्हणत असतानाच या वर्षी अन्नधान्याचे विक्रमी पीक आले आहे, असे सरकारी जाहिरातींमधून आकडेवारीसह सांगण्यात येत आहे. नानाविध जिनसा आज ज्या सहजतेने बाजारामध्ये उपलब्ध आहेत, त्याद्वारेही याचे प्रत्यंतर येते आहे. तेव्हा, तुटवड्यापायी भाववाढ निर्माण झाली, असे स्थानिक बाजारपेठेमध्ये तरी निदर्शनास येत नाही. आज साखरेच्या उत्पादनात वाढ झाली आहे. साखरेचे साठे पडून आहेत. गळीत हंगाम पूर्ण झाले आहेत आणि लगेचच साखरेच्या भावात अचानक वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. लोकसंख्येस पुरून उरेल एवढा साखरेचा साठा देशात उपलब्ध असतानाही ही ३० ते ४० टक्क्यांची भाववाढ कशामुळे ? लोखंड, सीमेंट, खनिज तेल यांसारख्या जिनसांचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील भाव त्यांच्या देशांतर्गत भावपातळीवर प्रभाव टाकू शकतात, हे समजू शकते. परंतु, साखरेचे काय ?

(३) बाजारामध्ये पैशाच्या उपलब्धतेत वाढ झाल्याने त्याची परिणती भाववाढीमध्ये होत आहे, असे विश्लेषण लेखात केलेले आहे. बाजारामध्ये पैशाची उपलब्धता वाढली आहे, याबाबत दुमत होण्याचे नाही. पण ही उपलब्धता किती लोकांच्या हातात वाढली ? 'इंडिया'तील ठरावीक लोकांच्या हातीच ती वाढलेली दिसते. उदाहरणार्थ, माहिती-तंत्रज्ञान आणि वाहननिर्मिती ही दोन उद्योगक्षेत्रे आणि

त्यांच्या अनुषंगाने अस्तित्वात असलेल्या सेवा यांत सक्रिय असलेल्या लोकांच्या हातात अतिरिक्त पैसा उपलब्ध झालेला दिसतो. 'जीडीपी'मध्ये वाढ घडवून आणण्यासाठी या दोन्ही उद्योगव्यवसायांना सरकार सातत्याने प्रोत्साहन देत असते. 'शेतीप्रधान देश, शेतीसाठी भरीव तरतूद' यांसारखी वक्तव्ये तोंडाने करावयाची, परंतु, प्रत्यक्ष कृती करताना मात्र 'जीडीपी' (ग्रोथ डिपेन्डन्ट पॉव्हर्टी) वाढविण्याचा 'शॉर्ट कट' वापरावयाचा असा हा सारा प्रकार आहे.

(४) 'कृषिक्षेत्रासाठी दिली जाणारी अनुदाने' असा ज्यांचा निर्देश केला जातो, ती अनुदाने अन्नधान्याच्या किंमती वाढू नयेत यांसाठी दिली जातात. ती शेती अथवा शेतक-यांसाठी नसतातच. म्हणूनच तर शेतक-यांच्या आत्महत्या वाढताना दिसतात. शहरांत राहणारे मध्यमवर्गीय आणि दोनचार टक्के संघटित कामगार व तत्सम यांसारख्यांनाच त्यांचा खरे तर लाभ मिळतो. आज खरी गरज आहे ती हे वास्तव मान्य करण्याची. परंतु, आपली विचारधारा आपण जोवर औद्योगिक कामगारांच्या ग्राहक किंमत निर्देशांकापुरतीच मर्यादित ठेवू तोवर आपण वास्तववादी अर्थकारण करू शकणार नाही. आता तर सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होतील. महागाई निर्देशांकाप्रमाणे ज्यांना महागाई भत्ता मिळतो अशांना या वेतन आयोगानुसार आणखी पगारवाढीची गरज आहे का ? अन्नधान्याव्यतिरिक्त शेतक-यांच्या ज्या अन्य गरजा आहेत त्या गरजा भागविणा-या जिनसा ज्या प्रमाणात महागल्या आहेत त्या मानाने शेतक-यांचे उत्पन्न मात्र वाढलेले नाही, ही वस्तुस्थिती मान्य करावीच लागेल.

**विनायक श्रीकृष्ण महाजन, कुडावळे, जिल्हा रत्नागिरी.**

**'कर्ता - करविता'** हे मेंदूसंशोधनासंदर्भातील अभ्यासपूर्ण, मुद्देसूद आणि वाचनीय पुस्तक सिद्ध केल्याबद्दल आपले अभिनंदन. गर्भावस्थेपासून ते वयाच्या पाचव्या वर्षापर्यंतच्या मुलाच्या वाढीचे अतिशय उपयुक्त विवरण आपल्या या ग्रंथात केलेले आहे. आजच्या विभक्त कुटुंबव्यवस्थेत अपत्याचे संगोपन पती-पत्नीच करीत असतात. आई होऊ घातलेल्या स्त्रीला अशासारखी सारी शास्त्रीय माहिती असेलच, असे नाही. त्यामुळे ऐकीव माहितीवरच विसंबिले जाते. तेव्हा, आपल्या पुस्तकातील ३ ते ८ व १५ ही प्रकरणे एखाद्या छोटेखानी पुस्तिकेच्या रूपाने वेगळी प्रकाशित केल्यास ते अतिशयच उपयुक्त ठरेल. आकार लहानसाच असल्याने मुली/स्त्रिया वाचनास चट्कन उद्युक्त होतील. आपण याचा विचार कराल का ?

**आनंद गोडसे, नागपूर.**

# अर्थ्यते इति अर्थः

'पु. ल. देशपांडे' म्हणजे मराठी सारस्वताच्या प्रांतातील एक अजोड व्यक्तिमत्व. पु. लं.च्या प्रत्युत्पन्नमतित्वाचे अनेक किस्से त्यांच्या आठवणींइतकेच सदाबहार. युरोपची मुशाफिरी करून आलेल्या पु. लं. ना एकाने विचारले की, एवढा युरोपचा फेरफटका मारून आलात त्या अर्थी पॅरिसला गेला असालच. पु. लं. चा होकार येताच त्या गृहस्थाने लगोलग पुढचा प्रश्न विचारला की, आपली संस्कृती आणि फ्रेंच लोकांची संस्कृती यांत तुम्हांला जाणवलेला सर्वांत ठसठशीत फरक कोणता ? अक्षरशः क्षणाचाही विलंब न लावता पु. लं.चे उत्तर आले - त्यांची 'द्राक्ष'संस्कृती आहे तर आपली 'रु द्राक्ष'संस्कृती ! पु. लं.च्या या प्रत्युत्तरात प्रचंड अर्थवत्ता दडलेली आहे. समग्र भारतीय जीवनदृष्टीचे इतके मार्मिक, नेमके, सारभूत आणि तरीही अल्पाक्षर वर्णन एकटे पु. ल.च करू जाणोत.

ऐहिक समृद्धीपेक्षाही आध्यात्मिक संपन्नतेचेच आकर्षण भारतीय मनाला पूर्वापार आहे. निदान, आपली तशी ठाम धारणा तरी आहे. त्यामुळे, साहजिकच लौकिक जीवनाकडे बघण्याचा सर्वसामान्य भारतीय जीवनाचा दृष्टिकोण हा भोगप्रवणतेपेक्षाही योगप्रवणतेकडेच अधिक झुकणारा असतो. भुक्तीपेक्षाही इथे मुक्तीचीच सद्दी अधिक. लौकिक जीवनव्यवहारांत गुंतून पडून अशाश्वत, नाशिवंत संपत्तीची साठवणूक करण्याच्या मागे लागण्यापेक्षा, पारलौकिकाच्या आराधनेमध्ये रममाण होऊन शाश्वत अशा आध्यात्मिक धनसंपदेचे स्वामी होण्याचे आवाहन करणा-या साहित्याचा चांगला भरभक्कम संभारही आपल्याकडे पूर्वापार आहे. असा हा निवृत्तिपर विचार हाच खरा आपला सांस्कृतिक वारसा, असे मानणारे आपल्या देशात बहुसंख्य. आजच्या एकविसाव्या शतकात, जागतिकीकरणाच्या सर्वत्र फोफावणा-या वा-यांबरोबर चंगळवादाचीही वावटळ उठली असल्याने खंतावणारेही संख्येने काही कमी नाहीत. पु. लं.च्या वरील उत्तरात आमच्या पारंपरिक विचारधारेचे हे सारे सूक्ष्मातिसूक्ष्म पदर गुंफलेले आढळतात. हे सगळे बघितले की मनात प्रश्न उमटतो की, भारतीय धर्मसंस्कृतिविचार खरोखरच इतका प्रवृत्तिपरान्मुख आहे का ? व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनात धनसंचय करणे हे पूर्वापारच गर्हणीय मानले गेले आहे का ? धनाबाबतची प्रीती ही अर्वाचीन आहे का ?

लौकिक जीवनविषयक आमच्या पारंपरिक धारणांचा शोध या अंगाने आपण जर घेऊ लागलो तर वस्तुतः तसे काहीही दिसत नाही. 'अर्थ'विचार हा आपल्या या भूमीत गेली काही हजार वर्षे अतिशय व्यवस्थितपणे विकसित होत आलेला आहे. किंबहुना, आमच्या परंपरेत अर्थशास्त्र हे एक 'दर्शन' गणले गेले आहे. ज्या शास्त्राच्या आधारे लौकिक तसेच पारलौकिक तत्त्वांचे यथार्थ ज्ञान होते त्याला भारतीय संस्कृतीमध्ये 'दर्शन' असे म्हटले जाते. म्हणून अर्थविचार हे एक 'शास्त्र' म्हणजे मुळात एक 'दर्शन' आहे. 'अर्थ' या संकल्पनेचे सर्वांगीण ज्ञान घडविणारे शास्त्र म्हणजे 'अर्थशास्त्र'. प्राचीन काळी अर्थशास्त्राला 'अर्थविद्या' अशीही संज्ञा योजलेली आढळते. 'अर्थ' या संज्ञेची वा संकल्पनेची व्याप्ती काळाच्या ओघात साहजिकच बदलत गेलेली आहे. आज आम्ही ज्याला 'इकॉनॉमिक्स' असे संबोधतो ती अर्थ वा वित्तविषयक ज्ञानशाखा खूपच अलीकडची आहे. परंतु, लौकिक दैनंदिन मानवी जीवनव्यवहार सुखसमृद्धीमय होण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्थ-वित्त-धन-संपत्ती इत्यादींचे व्यक्तिगत तसेच सामाजिक स्तरावरील संपादन,संवर्धन, उपयोजन आणि विनियोग यांबाबतचे विपुल चिंतन भारतीय विचारपरंपरेत पार ऋग्वेदकालापासून विद्यमान आहे.

'अर्थ' या संज्ञेचा परंपरेला अभिप्रेत असलेला अर्थही चांगलाच व्यापक आहे. आज आपण समजतो त्याप्रमाणे, 'अर्थ' म्हणजे केवळ पैसा वा वित्त नव्हे. ज्याची ज्याची म्हणून अपेक्षा केली जाते त्या सगळ्याला 'अर्थ' ही एक सर्वसमावेशक संज्ञा आहे. जमीन, सुवर्ण, गुरेढोरे, धान्य, उपकरणे अशा नानाविध बाबींचा अंतर्भाव 'अर्थ' या संकल्पनेत पूर्वापार होतो. या सा-याचे संपादन, विनियोग, वाटप आणि व्यवस्थापन हा 'अर्थशास्त्र' या दर्शनाचा गाभा होय. किंबहुना, मनुष्याच्या आर्थिक प्रयत्नांद्वारे जगात सुख व शांती निर्माण करणे, म्हणजेच, पर्यायाने विश्वकल्याण साधणे हा अर्थशास्त्राचा मूळ हेतू आहे, असे आमची परंपरा मानते. चतुर्विध पुरुषार्थामध्ये 'अर्थ' हा दुस-या क्रमांकाचा पुरुषार्थ गणला जातो तो उगाच नाही.

आजकाल सर्वत्र संचारलेल्या तथाकथित चंगळवादापायी अर्थविषयक विचाराला एकदम चालना आलेली आहे, असे समजणेही दिशाभूल करणारे ठरेल. एक प्राचीन विद्या म्हणून भारतीय परंपरेत अर्थशास्त्र प्रतिष्ठित आहे. 'अर्थशास्त्र'नामक विद्या अगदी वेदकाळापासून अस्तित्वात आहे. भूप्रदेश संपादन करण्याचे व संपादन केलेला भूप्रदेश जतन करण्याचे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र, असे भारतीय परंपरेत समजले जाते. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चार वेदांचे पुन्हा काही उपवेद

गणले जातात. या उपवेदांमध्ये 'अर्थवेद' नावाचा उपवेद असून तो ऋग्वेदाचा उपवेद समजला जातो. 'अर्थशास्त्र' या संकल्पनेचा आज जो अर्थ प्रचलित आहे, त्यापेक्षा प्राचीन काळी या संज्ञेचा अर्थ अतिशयच भिन्न आणि व्यापक होता. त्याला राजधर्माचे, राज्यव्यवहारशास्त्राचे अंग होते. मुळात, अर्थशास्त्र प्रारंभी धर्मशास्त्रातच अंतर्भूत होते. अर्थशास्त्राचा विचार धर्मशास्त्राच्या अनुषंगानेच केला जात असे. अर्थशास्त्राचा धर्मनिरपेक्ष विचार हा महाभारतकालापासून सुरू झाला. त्यातून, अर्थशास्त्राच्या अभ्यासास तसेच अर्थविचारास निराळीच दिशा लाभली. भूमी आणि लोक यांच्यावर अधिपत्य मिळविण्यासाठी आणि मिळालेले अधिपत्य टिकविण्यासाठी भारतीयांमध्ये स्पर्धा तेथपासून सुरू झाली. पुढे, पृथ्वी जिंकण्यास आणि जिंकलेल्या पृथ्वीचे रक्षण करण्यास उपयुक्त असे शास्त्र अशी व्याख्या करीत कौटिल्याने 'अर्थशास्त्र' ही संज्ञा अधिक सुबद्धपणे सिद्ध केली. कौशल्यपूर्वक संपत्ती कशी प्राप्त करून घ्यावी हे ज्या शास्त्रात सांगितले गेलेले आहे, त्यास 'अर्थशास्त्र' असे म्हणावे, असे विविध सूत्रकारांनीही नोंदवून ठेवले आहे. सर्व प्रकारची संपत्ती व वैभव यांसंबंधीचे विवेचन करणे हाच आद्य हेतू असलेले शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र, ही व्याख्या या पद्धतीने परंपरेत उत्क्रांत झालेली दिसते.

महाभारतातील धर्म हा प्रधानतः प्रवृत्तिधर्म आहे. साहजिकच, धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांचा महाभारतात समान प्रतिष्ठेनेच विचार केलेला दिसतो. धन हे राष्ट्राचे बल आहे, हा विचार महाभारतामध्ये बलवत्तर आहे. महाभारतातील राजधर्मामध्ये राजाला त्रयी (तीन वेद), आन्विक्षिकी (तर्कशास्त्र) आणि वार्ता (कृषी व व्यापारविषयक ज्ञान) या तीन्हीचे उत्तम आकलन असावयास हवे, असे प्रतिपादन आग्रहपूर्वक केलेले आहे. विशिष्ट भूप्रदेश आणि बरीचशी लोकसंख्या हे राज्याचे दोन मुख्य घटक गणले जात. आता या भूमीचे, लोकांचे म्हणजेच राज्याचे पालनपोषण करावयाचे तर राजापाशी धनसंपत्ती हवीच. भारतीय विचारपरंपरेतील बहुतेक शास्त्रकारांनी राज्याची जी सात अंगे प्रधान मानलेली आहेत त्यांत 'कोश' अथवा 'खजिना' हे पाचव्या क्रमांकाचे अंग गणले गेले आहे.

महाभारत आणि कौटिलीय अर्थशास्त्रात कोशाचे माहात्म्य आवर्जून वर्णिलेले आहे. राजाची आणि पर्यायाने राज्याची सर्व कामे ही कोशावरच अवलंबून असल्याने राजाने कोशाकडे प्रथम लक्ष दिले पाहिजे, हा कोशविषयक विवेचनाचा सारभूत गाभा आहे. हा कोश भरण्याचे मुख्य साधन म्हणजे राज्यातील नागरिक तसेच व्यापारादी

व्यवहारांवर केली जाणारी करआकारणी. करआकारणीच्या रूपाने खजिन्याच्या वृद्धीसाठी राजाने प्रयत्नशील राहणे, हा जसा त्याच्या राजधर्माचा एक कर्तव्यभाग होता त्याचप्रमाणे, राज्याच्या संपत्तिव्यवहाराला राज्यातील प्रत्येक मनुष्याने यथाशक्ती हातभार लावलाच पाहिजे, असाही सिद्धांत तत्कालिन कामकाजात प्रचलित होता, हे कोशविषयक पारंपरिक चिंतनाचे एक मोठे वैशिष्ट्यच गणले पाहिजे. एखादा माणूस अगदी कितीही गरीब असला तरी तो जर काही व्यवसाय करीत असेल तर दरवर्षी राज्याच्या खजिन्यात त्याने कराच्या रूपाने थोडीतरी का होईना भर ही घातलीच पाहिजे, असा संकेतवजा दंडक त्या विचाराचा द्योतक होय. अंगमेहनतीचे काम करून उदरनिर्वाह करणा-यांना द्रव्याच्या रूपाने कोशात काही भर घालणे शक्य नसल्यास राजाने महिन्यातून एक दिवस त्यांना विनावेतन काम करण्यास सांगावे, असा पर्याय सांगितलेला होता. मात्र, असे विनावेतन काम करणा-यांना त्या दिवशी भोजन देण्याचे बंधन राजावरही होते !

करआकारणी व वसुलीविषयक भारतीय चिंतन हे जितके प्राचीन तितकेच विविधांगी, बहुआयामी आहे. करआकारणी हे राजकोशाची तंदुरुस्ती बुलंद राखण्याचे एक मुख्य साधन असले तरी करांची आकारणी करण्याबाबत मनमानी करण्याचा राजाला अधिकार नव्हता. स्मृतींनी घालून दिलेल्या करविषयक नियमांना अनुसरुनच करांची आकारणी व अंमलबजावणी करणे राजाला भाग होते. कोणत्या दराने करआकारणी करावी यांबाबतचे नियम स्मृती ग्रंथांमध्ये नमूद केलेले होते. करांच्या या स्मृतिप्रणित दरांमध्ये काळ -वेळ -प्रसंग -परिस्थितीनुरुप बदल, फेरफार अथवा वाढ वा कमीजास्तपणा करण्याचा अधिकार राजाला जरूर होता. परंतु, स्मृतिमान्यता लाभलेल्या करांव्यतिरिक्त एखादा कर आकारावयाचा असेल तर राजाने प्रथम प्रजाजनांची त्याबाबत याचना करावी, असे चाणक्य स्पष्टपणे नमूद करून ठेवतो. असे अतिरिक्त कर हे केवळ आपत्कालिक असावेत, त्यांची आकारणीही मर्यादित काळासाठीच व्हावी, असेही निर्बंध राजावर असत.

कोशवृद्धीसाठी राजाने आपल्या राज्यात जे कर बसवावयाचे ते कर नागरिकांवर अतिरिक्त बोजा टाकणारे असता कामा नयेत, ते कर लोकांना हलके वाटले पाहिजेत असाही संकेत करविषयक विचारमंथनात दिसतो. करांचे दर व त्यांची आकारणी ही अवाजवी जास्त वा अतिशय कमी अशी नसावी, असे यांबाबत नमूद केलेले आढळते. करआकारणी व वसुलीच्याबाबतीत राजाची भूमिका ही माळ्याप्रमाणे नव्हे तर, मधमाशीप्रमाणे असावी, असे मोठे मार्मिक प्रतिपादन महाभारतामध्ये केलेले आहे.

मधमाशी ज्याप्रमाणे मधुसंचयासाठी बागेतल्या प्रत्येक फुलावर जाऊन बसते आणि फुलाचा नाश होणार नाही याची काळजी पूर्ण काळजी घेऊन त्यातील मध अलगद हळुवारपणे शोषून घेते त्या न्यायानुसार राजाने प्रजेकडून कर वसूल करावा, हा याचा इत्यर्थ. मध गोळा करण्यासाठी मधमाशी फूल न फूल तपासते, परंतु, माळी मात्र फूल डेखापासूनच खुडून टाकतो. कोळसा करण्यासाठी झाडच समूळ तोडणा-याप्रमाणे, करभरणा करण्याबाबतच्या आपल्या प्रजाजनांच्या क्षमता राजाने निखंदून टाकता कामा नयेत, यावर महाभारतकारांचा असलेला कटाक्ष यातून स्पष्ट होतो. कर वाढवावयाचा जरी झाला तरी अशी करवाढ ही एकदम न करता क्रमाक्रमाने आणि प्रत्येक वेळी थोडथोडी अशी करावी, अशी मार्गदर्शक तत्त्वेही शास्त्रकारांनी नमूद केलेली दिसतात.

राज्यव्यवस्था कार्यक्षमपणे चालावी यासाठी द्रव्य गोळा करणे, हे भारतीय विचारपरंपरेत राजाचे अनिवार्य कर्तव्यच गणले गेले आहे. राजाला सर्वसाधारणपणे ज्या आठ मार्गांनी द्रव्यसंचय करता येणे शक्य आहे अशा आठ पर्यायांना सूत्रकार 'अष्टवर्ग' असे संबोधताना दिसतात. शेती, व्यापार, खाणी खणणे, सोन्यासारख्या मौल्यवान धातूंचा संग्रह करणे, पाणी अडविणे यांसारख्या पर्यायांचा यांत अंतर्भाव केलेला आढळतो. राज्यावर काही संकट आले असता, प्रजाजनांना विनंती करूनही राज्याचा कोश पुरेशा प्रमाणात भरला नाही तर, आपल्याजवळील सुवर्णसाठ्यापैकी जेवढे सोने राजकोशासाठी देणे राज्यातील धनिकांना शक्य आहे, तेवढे सोने देण्याबाबत राजाने त्यांना राजी करावे असाही एक उपाय सुचविलेला दिसतो. त्या बदल्यात राजाने अशा धनवंतांना आपल्या दरबारात मानाची एखादी जागा देऊ करावी अथवा आभूषणे देऊन त्यांचा आदरसत्कार करावा, असेही विविध सूत्रकारांनी सुचविलेले आहे. अगदीच कडोविकडीचा प्रसंग आल्यास कोशभरणासाठी राज्यातील व्यापारी संघ तसेच देवस्थानांजवळील संपत्ती घेण्यासही शास्त्रकारांनी राजाला अनुमती दिलेली आहे. या उपरही द्रव्याची अडचण दूर न झाल्यास, व्याज देण्याचे वचन देऊन राजाने आपल्या राज्यातील धनिकांची संपत्ती कोशासाठी घ्यावी आणि संकटाचे निराकरण झाल्यानंतर घेतलेली संपत्ती सव्याज परत करावी, असेही सूत्रकारांनी सांगून ठेवले आहे.

राज्याच्या खजिन्यामध्ये द्रव्य जमा होण्याचे निरनिराळे मार्ग असले तरी राज्याला नित्य आणि हमखास वित्तपुरवठा करणारे काही स्रोत हे असलेच पाहिजेत, यांवरही प्राचीन काळापासून भर देण्यात आल्याचे आपल्या ध्यानात येते. जमिनीच्या उत्पन्नावरील कर, राज्यात आयात होणा-या तसेच राज्यातून बाहेरच्या प्रदेशांत निर्यात

होणा-या जिनसांवर आकारली जाणारी जकात, राज्यांतर्गत बाजारपठ्तां्ल व्यापा-यांवर आकारले जाणारे शुल्क आणि अपराध्यांकडून वसूल केला जाणारा दंड हे राष्ट्राला बारमाही निधी मिळवून देणारे उत्पन्नाचे मार्ग गणले जात. आयात -निर्यातीवरील जकातीमध्येही दोन प्रकार पूर्वापार आढळून येतात. जमिनीवरून आयात -निर्यात केल्या जाणा-या मालावरील जकात आणि जलमार्गाने केली जाणारी आयात -निर्यात हे ते दोन प्रकार होत. राजकोशाचे व्यवस्थापन काटेकोरपणे व्हावे यासाठी राजाने दर दिवसाचे, महिन्याचे आणि वर्षाचे जमाखर्च नियमित ठेवावेत, असाही दंडक असे.

भारतीय संदर्भात 'अर्थशास्त्र' या ज्ञान व राज्यव्यवहारशाखेची चर्चा चाणक्याच्या चिंतनाची दखल घेतल्याखेरीज पुढे सरकूच शकत नाही. धर्म, अर्थ आणि काम या त्रिविध पुरु षार्थामध्ये कौटिल्य सर्वाधिक महत्त्व देतो ते अर्थाला. कोणतेही राज्य हे तीन शक्तींनी युक्त असावयास हवे, असे चाणक्याचे प्रतिपादन आहे. राज्यशकट ज्याने हाकावयाचा त्या राजाच्या ठायी असणारा उत्साह व त्याचे वैयक्तिक बल ही झाली त्यांतील पहिली शक्ती. 'उत्साहशक्ती' अशी संज्ञा कौटिल्याने त्यासाठी योजलेली आहे. 'प्रभावशक्ती' ही झाली दुस-या क्रमांकाची शक्ती. सैन्याचे बल आणि कोशाचे बल असे दोन पोटविभाग कौटिल्याने तिच्यात केलेले आहेत. 'मंत्रशक्ती' ही राज्याची तिसरी शक्ती. 'मंत्रशक्ती'म्हणजे मुत्सद्देगिरीचे आणि सल्लामसलतीचे बल.

शेतकी, पशुपालन आणि व्यापार या तिघांना अनुलक्षून भारतीय विचारपरंपरेत 'वार्ता' अशी संज्ञा योजली गेलेली दिसते. वार्तेमुळे लोकांच्या योगक्षेमाची चिंता मिटते. वार्तेमुळेच राज्याला धनधान्य आणि विविध वस्तूंचा लाभ होतो. खजिन्यात भर पडते ती वार्तेमुळेच. परिणामी, या वार्ताज्ञानाला कौटिल्याने वेदज्ञानाच्या पंक्तीस बसविले आहे. साहजिकच, चाणक्यप्रणित शासकव्यवस्थेत सर्वांत महत्त्वाचा ठरतो तो समाहर्ता. राज्याचे अंदाजपत्रक तयार करणे हे या समाहर्त्याचे मुख्य काम. राज्याच्या विविध घटकांकडून व्हावयाच्या करवसुलीची रक्कम निश्चित करावयाची ती त्यानेच. जमा झालेल्या रकमेच्या विनियोगाबाबतही अंतिम निर्णय समाहर्त्याचाच. अधिकाधिक महसूल गोळा कसा करावयाचा आणि त्याच वेळी खर्चही किमान राहील याची काळजी कशी घ्यावयाची हे बघणाराही समाहर्ताच.

मानवी जीवनाची धारणा ज्या धनवित्तामुळे होते त्या धनविचाराचा समष्टी स्तरावरील विस्तार भारतीय ज्ञानविश्वात असा औरसचौरस आहे. ■■

# कष्ट करा, स्वयंपूर्ण बना आणि संपत्ती वाटा !

एकेकाळी जगाच्या नकाशात आपला मायदेशच नसलेल्या ज्यू समाजाने अतिशय कष्टाने आपल्या इस्त्रायल राष्ट्राची निर्मिती केली आणि थोड्याच कालावधीत आपला देश स्वयंपूर्णही बनविला. मेहनती आणि बुद्धिमान समाज अशी ज्यूंची ओळख बनली आहे. ज्यू लोकांचा धर्म जुडाइझम आहे. मायभूमी नसल्याने जगभर - विशेषतः अमेरिकेत - स्थलांतर केलेल्या ज्यू नागरिकांचा, अमेरिकेच्या विकासात मोठा सहभाग राहिला आहे. आज अमेरिकेतील संपन्न समाजात ज्यूंची गणना होते. संपन्नतेचे महत्त्व ज्यू समाज-संस्कृतीत अधोरेखित होते. कारण, त्यांच्या धर्म व जीवनव्यवहारविषयक Talmund आणि Mishna या ग्रंथांत आणि लोककथांमध्ये 'जिथे पीठ नाही, तिथे बायबल नाही' (Where there is no flour, there is no Bible), 'एखाद्या घरात गरिबी असणे हे रोगापेक्षा वाईट आहे' (Poverty in a man's house is worse than fifty plagues), 'गरिबीमुळेच अपराध घडतात' (Poverty causes transgression) असे म्हणून ठेवण्यात आले आहे. 'गरिबी नको आणि समृद्धी हवी' हे मूल्य ज्यू धर्मीयांच्या मनामनांत रुजल्यानंतर समृद्धीचा ध्यास घेणे व त्यासाठी कष्ट करणे हे ओघाने आलेच. त्यामुळे हा समाज कष्टाळू बनणेही स्वाभाविकच ठरले.

ज्यू धर्माच्या स्थापनेपासूनच समृद्धीच्या मूल्याचा अंतर्भाव त्यात झाला आहे, असे ज्यू धर्मीयांना वाटते. ज्यू धर्मीयांचा आद्य पुरुष आहे अब्राहम. अब्राहमचा नातू जॅकोब. याचेच दुसरे नाव इस्त्रायल. या इस्त्रायलला बारा मुले होती. ही बारा मुले व त्यांचे वंशज 'इस्त्रायली' म्हणून ओळखले जाऊ लागले (कालांतराने ज्यूंच्या देशाचे नाव इस्त्रायल ठेवण्यात आले). इस्त्रायलच्या एका मुलाचे नाव जुडा होते. त्यावरून 'ज्यू' व 'जुडाइझम' हे शब्द रूढ झाले असावेत, असे म्हटले जाते. हा ज्यू समाज सुमारे चार हजार वर्षांपासून एकसंध राहिलेला व आपल्या विशिष्ट धर्माचे, परंपरांचे कसोशीने पालन करणारा गट म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि जुडाइझम हा धर्म म्हणून नेमका केव्हा उदयास आला याबाबत स्पष्टता आढळत नाही. आज ज्या भागात पॅलेस्टाईन आहे तेथेच या समाजाचा प्रारंभीचा काळ गेला. इसवी सनापूर्वी आठव्या

शतकात असीरियन व बॅबिलोनियन लोकांनी ज्यू लोकांची हकालपट्टी केली. तेव्हा अनेक ज्यूंना देशोदेशी स्थलांतर करावे लागले. रोमन साम्राज्याच्या काळात ज्यूंचे वसतिस्थान मुख्यतः मध्यपूर्व होते. रोमन साम्राज्याचा अस्त झाला तसे ज्यू लोक पश्चिम युरोपीय देशात गेले आणि तेथील बौद्धिक व आर्थिक जीवनात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. इसवी सनाच्या नवव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत, विशेषतः स्पेनमध्ये त्यांच्या साहित्य क्षेत्रातील कामगिरीला बहर आला. मात्र धर्मयुद्धांच्या काळात (साधारणपणे इसवी सन १०९७ते १२६३) ज्यूंच्या छळाला प्रारंभ झाला तो अठराव्या शतकापर्यंत. या काळात त्यांना जमिनी विकत घेण्यास प्रतिबंध होता. किरकोळ व्यापार आणि सावकारी या व्यतिरिक्त त्यांना कोणताही प्रतिष्ठित व्यवसाय करता येत नसे. त्यांनी विशिष्ट भागांतच (त्यांच्या वस्तीचा उल्लेख 'घेटो' असा केला जात होता) राहावे असे म्हटले जाई. ज्यूंना आपली स्वतःची मातृभूमी असली पाहिजे अशा चळवळीने पहिल्या महायुद्धानंतर विशेष जोर धरला होता. दुस-या महायुद्धानंतर १९४८ मध्ये ज्यूंच्या इस्रायल या राष्ट्राची निर्मिती झाली. इस्रायलमधील ज्यू समाजात मूळ ज्यू रहिवासी, स्थलांतरित ज्यू आणि अरब राष्ट्रातून आलेले ज्यू अशा तीन विभिन्न परिस्थितीतून आलेल्यांचा समावेश आहे. स्थलांतरित होऊन आलेले ज्यू सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्या एक असले तरी त्यांच्या राजकीय व आर्थिक दृष्टिकोणात भिन्नता आढळते. कारण ते ज्या राष्ट्रातून आले तेथील संस्कार त्यांच्या विचारांमध्ये डोकावतात.

अब्राहमच्या काळातच या लोकांकडे मुबलक जमीन व पशुधन होते. त्यामुळे त्या काळातील आपले पूर्वज संपन्न जीवन जगत होते, असे ज्यूंना वाटते. संपन्नतेकडे वाटचाल करण्याचे बाळकडू आपल्याला प्राचीन काळापासून मिळाले आहे, अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली आहे. काळाच्या ओघात समाज-संस्कृतीत बदल घडत जातात आणि समाज-संस्कृतींतील मूल्यांचे परिणाम समाजव्यवहारावर होत जातात. म्हणून संपन्नतेचे मूल्य मनात बाळगणा-या या समाजाने अर्थविषयक/भांडवलशाहीसंदर्भात काय विचार केला आहे, भांडवलशाहीविषयक विविध घडामोडींवर या समाजाच्या मूल्यांचे कोणते परिणाम घडून आले आहेत, हे पाहणे उद्बोधक ठरते. काही अभ्यासकांनी याबाबत मते मांडली आहेत.

जुडाइझम आणि ज्यू नागरिक या दोन बाबी भिन्न मानल्या पाहिजेत, असे जोनाथन सॅक्स (लंडन येथील ज्यू महाविद्यालयातील माजी प्राचार्य, धर्मगुरू व लेखक) यांनी म्हटले आहे. भांडवलशाहीच्या विकासात या दोहोंचा प्रभाव पडलेला

दिसतो. कर्मचा-यांनी उत्कृष्ट काम करण्याचे मूल्य अंगी बाणविले पाहिजे आणि व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठी खाजगी मालमत्तेचा अधिकार असला पाहिजे, यांवर जुडाइझमने भर दिला आहे. भौतिक समृद्धी हे देवाचे आशीर्वाद असून व्यक्तीने उत्तम काम करणे म्हणजे (भौतिक वस्तूंच्या ?) निर्मितीच्या क्षेत्रात देवाबरोबर जणू भागीदार बनणे होय, असे जुडाइझमने मानले आहे. मध्ययुगीन कालखंडात ज्यूंना जमिनी नाकारण्यात आल्या, त्यांना व्यावसायिक संधी मिळाली नाही. त्या वेळी अनेक ज्यू नागरिकांना उदरनिर्वाहासाठी व्यापाराचा व वित्तक्षेत्राचा आधार घ्यावा लागला. परिणामी बँकिंग व वित्तव्यवसायात आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात ज्यू अग्रक्रमावर राहिले.

मुक्त बाजारपेठीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भातही जुडाइझमचा विचार करता येतो. जुडाइझमचा भर प्रामाणिकपणा, नैतिकता, व्यक्तिगत स्वातंत्र्य यांवर तसेच व्यक्तींची सामाजिक बांधिलकी यांवर आहे. वैयक्तिक मालमत्तेला हिब्रू बायबलने महत्त्वाचे मानले आहे. त्यानुसार राजालादेखील कोणा व्यक्तीच्या जमिनीवर जुलुमाने आपला हक्क प्रस्थापित करता येत नाही. वैयक्तिक मालमत्तेप्रती आदर ठेवून त्या संबंधी शासनाचे मर्यादित अधिकार याला जुडाइझमची मान्यता आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीने आपली आर्थिक प्रगती स्वतःच्याच प्रयत्नांवर करावी, हा विचारही जुडाइझममध्ये महत्त्वाचा मानला गेला आहे. स्वातंत्र्याप्रमाणेच समाजातील सर्वांचा आदर करणे, मानवी प्रतिष्ठा जोपासणे आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून योग्य वर्तणूक ठेवून समाजासाठी दान करणे, ही मूल्येदेखील जोपासण्यावर या धर्माचा भर आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करणे हे जुडाइझममध्ये सर्वांत मोठे दान समजले गेले आहे. त्यामुळे वैयक्तिक व सामाजिक प्रगती घडून येण्यास मदत होते. बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही एकप्रकारे स्वतःच स्वतःची शत्रू आहे असे जोनाथन सॅक्स यांना वाटते. या भूमिकेसाठी ते स्पष्टीकरण देतात.

सातत्यशील असणारी बाजारपेठीय अर्थव्यवस्था काही मूल्यांवर आधारित असते आणि ही मूल्ये बाजारपेठेने निर्माण केलेली नसतात, ती धर्म-संस्कृतीतून, कुटुंबांतून मिळालेली असतात. उदाहरणार्थ - प्रामाणिकपणा, नैतिक वागणूक, मालकांप्रती व ग्राहकांप्रती निष्ठा, विश्वासार्हता इत्यादी. तसेच बळकट कुटुंबे, व्यक्तींची शिक्षणाप्रती आस्था, समाजाप्रती बांधिलकी या बाबीदेखील दीर्घकाळाचा विचार करता उपयुक्त ठरतात. बाजारपेठीय अर्थव्यवस्थेमुळे स्पर्धेला चालना मिळते. सहकाराची सवय अंगी बाणविली तर त्या स्पर्धेत समतोल राखला जाऊ शकतो. पण वस्तुतः आपल्या

अस्तित्वासाठी आवश्यक असणारी मूल्येच ही बाजारपेठीय व्यवस्था नष्ट करते. खुल्या अर्थव्यवस्थेच्या अनेक घटकांपैकी एक घटक म्हणजे बाजारपेठीय अर्थव्यवस्था असते, हे येथे समजून घेतले पाहिजे. खुली बाजारपेठीय अर्थव्यवस्था टिकून राहण्यासाठी व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तींप्रती आदर, विविध प्रकारच्या कामांना असलेले मूल्य व त्या कामाकडे बघण्याचा व्यक्तींचा सकारात्मक दृष्टिकोण आणि नाविन्य व रचनात्मकतेचे कौतुक या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

एकूणच अर्थव्यवस्थेकडे बघण्याचा धर्म-संस्कृतींचा दृष्टिकोण समतोल असेल तर त्यामुळे आर्थिक प्रगतीला चालना मिळण्याची शक्यता वाढते. उदाहरणार्थ, जुडाइझममध्ये 'सब्बाथ'ला (Sabbath) - म्हणजे एकप्रकारे साप्ताहिक सुटीला - महत्त्व आहे. या दिवशी बाजारपेठ बंद असते. कोणीही कोणत्याही प्रकारचे काम करीत नाही. म्हणजे, २४X ७ हे तत्त्व जुडाइझममध्ये बसत नाही. यामुळे भौतिक सुखाच्या मागे धावण्याच्या गतीवर आपोआप नियंत्रण येते. मानसिक व शारीरिक धावपळीला लगाम बसतो आणि दैनंदिन जीवनातील ताणतणाव कमी होतात. तसेच कुटुंबव्यवस्था बळकट होण्यास मदत होते. आजच्या वेगवान युगातही 'सब्बाथ'चे पालन कसोशीने करण्याचा प्रयत्न या समाजाकडून केला जातो. 'सब्बाथ'चे पालन प्रत्येक व्यक्तीने व कुटुंबाने केले की अंतिमतः त्याद्वारे समाजाचे भलेच होते. व्यक्ती आणि कुटुंबाबरोबर समाजाचे व्यापक हित जोपासले जावे, या ज्यू धर्मियांच्या दृष्टिकोणामुळेच हा समाज टिकू शकला आणि आपले राष्ट्र स्थापन करू शकला, असे सॅक्स यांना वाटते.

अर्थउद्योगात प्रगती करताना नैतिकतेला महत्त्व मिळावे असे या समाजाच्या साहित्यात स्पष्ट करण्यात आले आहे. व्यापारविषयक दैनंदिन कामात चोख असणे म्हणजे उत्पादनांचा दर्जा, वजन इत्यादी बाबींकडे नीट लक्ष देणे, ठरावीक मुदतीत कर्जाची परतफेड करणे, कर्मचा-यांप्रती योग्य वागणूक ठेवणे अशी मूल्ये या समाजात गरजेची मानली गेली आहेत. अप्रामाणिकपणा व शोषण यांना थारा न देणे या बाबींचा उल्लेख समाजाच्या उदयाच्या काळापासून करण्यात आला आहे. समाजाचा विकास जसजसा होऊ लागला तसतशा व्यापारविषयंक घडामोडी वाढू लागल्या आणि नैतिक मूल्यांची निकडही जाणवू लागली. अभ्यासक Dr. Meir Tamari यांनी 'विथ ऑल युअर पझेशन्स : ज्युइश एथिक्स अँड इकॉनॉमिक लाइफ' या पुस्तकात या विषयाची मांडणी केली आहे. न्याय्य व्यापार, कर्मचा-यांचे हक्क, जाहिराती

करताना प्रामाणिकपणा जोपासणे, असमान व अयोग्य ठरू शकणारी स्पर्धा अशा अनेक बाबींचा ऊहापोह त्यांनी केला आहे. 'द चॅलेंज ऑफ वेल्थ : अ ज्युइश पर्स्पेक्टिव्ह ऑन अर्निंग अँड स्पेन्डिंग' असाही त्यांचा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, अतिरेकी हांव आणि गरिबी व अनिश्चिततेमुळे निर्माण होणारी भीती या गोष्टींमुळे माणसे आर्थिक गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. अशा वेळी देवाने/दैवाने दिले आहे त्यात समाधान मानावे, असे म्हणून आपल्या दैनंदिन आयुष्यातील देवाची/दैवाची भूमिका मान्य करून माणसांना दुर्वर्तनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न काही प्रमाणात करता येतो. पण गरिबी दूर होण्याच्या दृष्टीने अशी काही यंत्रणा वा पद्धत यातून निर्माण करता येत नाही. शिवाय दर वेळी देवावर/दैवावर विसंबून राहणे व आहे त्यात समाधान मानणे म्हणजे गरीबांनी नेहमीच गरिबीत राहावे, असे म्हणणे होय. तसेच हा दैववाद मान्य करणे म्हणजे, ज्यांनी गरिबांच्या विकासासाठी प्रयत्न करावयाचा त्यांनीही आपल्या जबाबदारीपासून दूर पळणे होय. असे घडू नये यासाठी जुडाइझममध्ये काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. ज्यूंच्या कायद्याचे अभ्यासक Tur (१५ वे शतक) यांनी tzedakah कायद्याबाबत भाष्य केले आहे. कोणाही व्यक्तीने कर्तव्याच्या भावनेतून धर्मादाय कार्य करावे, असे त्यांनी म्हटले आहे. माणूस हा 'संपत्तीचा रक्षक' आहे, अशी जुडाइझमची भूमिका आहे. तसेच संपत्तीचा काही भाग इतरांच्या उन्नतीसाठी खर्च करणे हेही आवश्यक मानले गेले आहे. देवावर श्रद्धा ठेवणे ही बाब स्वतःपुरतीच मर्यादित ठेवणे अपेक्षित आहे. संपत्तीकडे पाहण्याचा व्यक्तीचा दृष्टिकोण 'माझे ते माझे व जे तुझे ते तुझे' असा असेल तर त्या माणसाला Mishna प्रमाणे सामान्य पातळीवरील माणूस म्हटले जाते. याचा अर्थ ती व्यक्ती दुस-याला मदत करण्यास उत्सुक नाही व सामाजिक जबाबदारी मानण्यास तयार नाही, असा होतो. असा स्वार्थ जुडाइझमला मान्य नाही.

समाजात अशी स्वार्थी माणसे असतातच. पण संपूर्ण समाज म्हणून जर अशी वर्तणूक होत गेली तर ते समाजसमूह शिक्षेसाठी पात्र ठरतात. आर्थिक व्यवहारात नैतिक वागणूकच महत्त्वाची ठरत असते. या संदर्भात एक उदाहरण देण्यात येते की, सधन शेतक-यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारे गरीब शेतक-यांची अडवणूक करून जर त्यांना त्यांची शेतजमीन विकण्यास भाग पाडले तर त्या व्यवहारात कायदेशीरदृष्ट्या काहीही गैर नसेल तरी तो व्यवहार अनैतिक ठरतो. समजा, एखाद्या गावातील नागरिकांनी गरिबांना आर्थिक मदत केली आणि दुस-या मार्गाने ती परत घेतली तर तेदेखील

अनैतिक ठरते. जुन्या काळात ज्यूंमधील सोडोम गटाबाबत असे घडल्याचे या संदर्भात सांगितले जाते. जुन्या काळी सोडोम गटाने अशी आर्थिक मदत करताना आपण देत असलेल्या चलनावर काही विशिष्ट खुणा करून दिल्या. त्यामुळे गरिबांना हा निधी तर उपलब्ध झाला पण त्यांच्याकडून हे खुणायुक्त चलन घेऊन त्यांना त्या बदल्यात अन्नधान्य देण्यास कोणी तयार झाले नाही. शेवटी गरिबांनी भुकेमुळे प्राण त्यागल्यानंतर हे चलन त्या गटाने परत मिळविले. म्हणजे त्यांची ही मदत ख-या अर्थाने मदत नव्हतीच. अशा प्रकारची दुष्टबुद्धी मालक-कर्मचारी, गरीब-श्रीमंत, दुकानदार-ग्राहक वा इतरांना होऊ नये तरच त्यांचा व्यवहार योग्य ठरेल, असे जुडाइझम मानतो.

अलीकडच्या काळात चंगळवाद फार बोकाळला आहे, असे म्हटले जाते. त्या संदर्भात जुडाइझमची भूमिका काय आहे ? जोनाथन सॅक्स असे स्पष्ट करतात की, जुडाइझममध्ये संपत्तीचा विचार 'वरदान' व 'जबाबदारी' अशा दोन्ही बाजूंनी केला जातो. सधन वर्गातील लोकांना जे वरदान मिळालेले आहे ते त्यांनी इतरांबरोबर वाटावे असे जुडाइझममध्ये म्हणण्यात आले आहे. म्हणजे, आपली सामाजिक जबाबदारी मान्य करून त्यांनी समाजासमोर आपला आदर्श ठेवावा अशी अपेक्षा असते. या संदर्भात ज्यूंच्या Hillelमध्ये असे म्हणण्यात आले आहे की, "If I am not for myself, who will be ? But if I am only for myself, what am I?"

जुडाइझममध्ये 'मालकी' (ownership) आणि 'ताबा' (possession) या दोन बाबी वेगळ्या आहेत. जे आपल्याकडे आहे ते आपलेच ('मालकी' या अर्थाने) असते, असे नाही. तर आपल्याकडे असलेली संपत्ती ही देवाचे विश्वस्त म्हणून आपण सांभाळायची असते. त्यामुळे गरिबी दूर करण्यासाठी तिचा उपयोग करणे हे त्यात अंतर्भूत आहे. संपत्ती मिळविणे आणि गरिबी दूर करण्याचा प्रयत्न करणे हे दोन्ही हातात हात घालून व्हायला हवे. संपत्तीविषयक असलेल्या या संकल्पना ज्यू समाजात ब-याच प्रमाणात अद्याप टिकून आहेत. किंबहुना, या संकल्पना व्यवहारात उतरविण्याचा प्रयत्न ज्यू नागरिक करीत असतात. त्यामुळे ज्यू समाज टिकून राहिला आहे, त्याची प्रगती झाली आहे, असे ज्यूंना वाटते.

शेकडो वर्षापूर्वी देशोदेशी स्थलांतर केलेल्या ज्यूंनी आपापल्या घरांत आपली धर्मसंस्कृती टिकवली, ती जोपासली एवढेच नव्हे तर ती आचरणातही आणली. जागतिकीकरणाच्या व मुक्त व्यापाराच्या काळातही आपल्या धर्म-संस्कृतीतील अर्थचिंतन योग्य ठरेल, असा त्यांचा विश्वास आहे. ■■

# सर्व संपत्ती अल्लाहचीच !

अनेक शतकांपूर्वी, मध्य आशियात इस्लामची स्थापना होऊन इस्लामचा प्रचार-प्रसार होऊ लागला तेव्हा झालेल्या एका लढाईत इस्लामच्या अनुयायांनी पर्शियन साम्राज्याचा पराभव केला. त्या वेळेची एक घटना इस्लामचा संपत्तीविषयक दृष्टिकोण कसा आहे यावर प्रकाश टाकते. विजयी झालेले इस्लामचे अनुयायी पर्शियन साम्राज्याचे वैभव आपले नेत्यापुढे - सैदना उमर अल-खताब यांच्यापुढे सादर करीत असताना पर्शियन साम्राज्याच्या वैभवाची खूण मानला गेलेला तलम गालिचा त्यांनी उमर अल-खताब यांच्यापुढे जमिनीवर अंथरला. तेव्हा अचानक उमर अल-खताब यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. विजयाचा आनंद होण्याऐवजी उमर अल-खताब यांना रडू का आले, असा प्रश्न त्यांना उपस्थितांनी विचारला. तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, संपत्तीची मुबलकताच पर्शियन साम्राज्याच्या विनाशासाठी कारणीभूत ठरली आणि तीच आपल्याकडे येऊन आपल्याला विनाशाची सूचना तर देत नाही ना, अशी भयशंका मनी दाटली म्हणून वाईट वाटले. अर्थात, इस्लामला संपत्तीचे वावडे आहे वा संपत्ती जमा करण्यास इस्लामचा विरोध असा या घटनेचा अर्थ नाही, असे अभ्यासक म्हणतात. संपत्तीची हांव नसावी तसेच तिचा संचय एका व्यक्तीच्या वा संस्थांच्या व सरकारच्या ठायी होऊ नये, अशी इस्लामची भूमिका आहे, हे येथे समजून घेतले पाहिजे, असे स्पष्टीकरण अभ्यासक देतात.

दैनंदिन व्यवहारात संपत्तीचे महत्त्व आहेच. संपत्ती मिळविणे व तिचा संचय हाही गरजेचाच असतो. पण त्याच वेळी संबंधितांजवळ आध्यात्मिक दृष्टिकोण असला पाहिजे, अशी इस्लामची भूमिका आहे. इस्लाम एकेश्वरवादी आहे. त्यामुळे जे काही घडते ते अल्लाहच्या मर्जीने आणि जे काही असते ते सर्व अल्लाहचेच असते. त्यामुळे सर्व संपत्ती ही एका अर्थाने अल्लाहचीच असते, असे इस्लाम धर्म मानतो. इस्लामचे काही अभ्यासक संपत्तीला सापाची उपमा देतात. सापाचे विष माणसाला मारते आणि त्याचा योग्य उपयोग केला तर माणसाला तारतेही, त्याप्रमाणेच संपत्तीचे कार्य असते. संपत्तीची चांगली व वाईट बाजू समजून घेतली तरच संपत्तीचा सुयोग्य उपयोग करता येतो. पण माणसे दर वेळी संपत्तीचा चांगला उपयोग करतात असे नाही.

म्हणून संपत्ती मिळविण्याबाबत व तिच्या विनियोगाबाबत इस्लाममध्ये काही बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. संपत्ती ही नेहमी प्रामाणिक राहून, कष्ट करून, चांगल्या मार्गानेच मिळविली पाहिजे. व्यापार-उद्योग वा नोकरी जे काम करीत असाल ते चोख केले पाहिजे. व्यापार-उद्योगांतून अधिकाधिक नफा मिळवून संपत्तीचा संचय मोठ्या प्रमाणावर करणे शक्य असते. त्यामुळे साहजिकच भौतिक सुखांच्या आहारी जाण्याचा मोह या क्षेत्रातील व्यक्तींना होऊ शकतो. म्हणून त्यांनी अल्लाहचे, प्रेषितांचे स्मरण केले पाहिजे. थोडक्यात, पैसा मिळवितानाही व्यापारी व उद्योजक यांना आपली जबाबदारी ओळखता आली पाहिजे, यावर इस्लामचा भर आहे.

संपत्तीला अरबी भाषेत al-ghina असे म्हटले जाते, याचा अर्थ no needs, or needs less असे इस्लामच्या काही अभ्यासकांनी म्हटले आहे. श्रीमंत व्यक्तींना al-ghaniyu असे म्हटले जाते. याचा अर्थ श्रीमंत व्यक्ती स्वयंपूर्ण आहेत, असा होतो. स्वयंपूर्ण असणे हे अल्लाहचे एक गुणवैशिष्ट्य वा लक्षण आहे. पण श्रीमंत व्यक्तींजवळ अल्लाहकडे असलेले आणखी एक गुणवैशिष्ट्य असायला हवे, असे इस्लाममध्ये म्हटले जाते. अल्लाह दयेचा सागर असतो, कृपासिंधू असतो, त्याचे हे गुणवैशिष्ट्य श्रीमंत व्यक्तींमध्ये असायला हवे. म्हणजेच त्यांच्या जीवनाला भौतिक व आध्यात्मिक बाजूंचा स्पर्श झालेला असला पाहिजे. भौतिक संपत्तीला Maal (अनेकवचन - Amwaal) अशी संज्ञा आहे, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. याचा अर्थ जमीनजुमला, स्थावर मालमत्ता असा आहे. तर 'ज्ञान' ही संपत्तीची आध्यात्मिक बाजू असल्याचे मानले जाते. म्हणजे इस्लाममध्ये श्रीमंत व्यक्ती 'ज्ञानी' असणे अपेक्षित आहे. जीवनाच्या या दोन बाजूंमध्ये परस्परसंबंधही आहे. निसर्ग हीदेखील एक संपत्तीच आहे. निसर्गाच्या मदतीने मानवाला संपत्ती मिळविणे शक्य झाले आहे. अगदी पशुधनापासून याचा प्रारंभ होतो. पूर्वीच्या काळी गरीब वा मध्यमवर्गाकडील गुरेढोरे ही त्यांची संपत्ती असायची तर तत्कालीन श्रीमंतांकडील उंटांच्या संख्येवरून त्यांच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज यायचा. अर्थात पशुधन हे एकमात्र धन नाही. तर, जमीनजुमला, शेतीवाडी, घरे, रोख पैसा आणि अलीकडे 'शेअर्स' हेदेखील संपत्तीत मोडते. भौतिक संपत्तीचे आकर्षण कमीअधिक प्रमाणात सामान्यतः सर्व माणसांना असते. मग ती संपत्ती आपल्या मुलाबाळांसाठी, पत्नीसाठी आणि इतर प्रियजनांसाठी राखून ठेवणे हेदेखील सहजपणे घडत जाते. पण कालांतराने भौतिक संपत्ती मिळविणे हेच माणसांच्या जीवनाचे उद्दिष्ट बनते. या उद्दिष्टपूर्तीत

माणूस समाधान शोधू पाहतो. पण त्याला खरे समाधान मिळतेच असे नाही. म्हणून ख-या समाधानासाठी माणसाने आध्यात्मिकतेकडे, ज्ञानाच्या मार्गाकडे वळणे उचित ठरते, असे इस्लामधर्मियांना वाटते. म्हणून भौतिक संपत्तीसाठी धडपडत असताना वा ती मिळविल्यावर आध्यात्मिक संपत्ती (ज्ञान) मिळविण्यासाठीही इस्लामधर्मियांनी प्रयत्नशील राहायला हवे, असे म्हटले जाते. माणसे आपल्या भौतिक संपत्तीच्या रक्षणाचा विचार करीत असतात (पण त्या वेळी माणसाचे रक्षण कोण करेल ?) तेव्हा त्यांच्याकडे असणारे ज्ञान त्यांची (माणसांची) योग्य काळजी घेईल, असे इस्लामच्या प्रचार-प्रसाराच्या काळात म्हटले गेले आहे.

इस्लाममध्ये संपत्तीला rizq असेही संबोधले गेले आहे. जीवन जगण्यासाठी साधन असा अर्थ याद्वारे व्यक्त होतो. ही साधने माणसाच्या प्रयत्नांतूनच निर्माण झालेली असतात असे नाही. तर मानवी जीवन निरंतर चालू राहावे यासाठी कधी ती अल्लाहने त्याला बहाल केलेली असतात. एखादी व्यक्ती मुस्लिम आहे किंवा नाही हे त्याच्या संपत्तीविषयक दृष्टिकोणातून, संपत्तीविषयक व्यवहारांतूनही समजून घेता येते, असे इस्लामच्या अभ्यासकांना वाटते. इस्लामी व्यक्तीने संपत्ती मिळवावी पण त्याची हांव धरू नये, संपत्तीवर प्रेम करण्यापेक्षा संपत्ती देणा-या अल्लाहवर माणसाने प्रेम करावे असा इस्लामचा दृष्टिकोण आहे.

संपत्तीचा विचार करताना काही अभ्यासक अर्थविश्वातील श्रम या संकल्पनेबाबतही आपले मत नोंदवितात. पाश्चात्यांच्या अर्थविश्वात श्रम (लेबर) अशी संज्ञा नेहमी वापरली जाते. त्यानुसार सेवा वा उत्पादन यांचा उपभोग घेणारी व्यक्ती या श्रमांची किंमत मोजत असते. इस्लाममध्ये श्रम ही संज्ञा अधिक व्यापक आहे. इस्लाममध्ये श्रमाला 'अमल' अशी संज्ञा असून त्या संदर्भातील नीतीमूल्यांबाबत काही बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. माणसाने सतत कार्यमग्न असावे असे कुरआनमध्ये म्हणण्यात आले आहे. आपला अमूल्य वेळ काहीही न करण्यात, स्वस्थ बसण्यात वाया घालवणे म्हणजे अल्लाहवर विश्वास न ठेवण्यासारखे आहे. शारीरिक व मानसिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत असलेल्या व्यक्तीने कामचुकारपणा करणे व इतरांवर एक ओझे बनून राहणे इस्लामच्या तत्त्वात बसत नाही. काम करणे हा हक्क नसून ते कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य निभावणे हे बंधनकारकही आहे. (अपवादात्मक स्थिती वगळता) जो श्रम (कष्ट) करेल तोच अल्लाहच्या मर्जीला पात्र ठरेल (म्हणजे संपत्ती मिळवेल), अशी इस्लामधर्मियांची श्रद्धा आहे.

अर्थात काम करताना कोणी कोणते काम करायचे हा व्यक्तिगत स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. तसेच इस्लामने वर्गभेदाला जागा न दिल्याने प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांनुसार उत्कृष्ट काम करावे व संपत्ती मिळवावी असे म्हणण्यात आले आहे. येनकेनप्रकारेण केवळ संपत्ती मिळवावी अशी इस्लामची भूमिका नसल्याने समाजाला उपयुक्त ठरेल असे आणि सद्‌विचाराने व प्रेमाने केलेले कार्य इस्लामच्या दृष्टीने योग्य ठरते. गैरमार्गाने मिळविलेली संपत्ती 'शरिया'ला मान्य नाही. तसेच, 'मनात हांव बाळगून' मिळविलेली संपत्ती हा इस्लामसाठी 'भ्रष्टाचार'च ठरतो.

'समाजव्यवस्थेचे रक्ताभिसरण' या दृष्टीने संपत्तीचा विचार इस्लाममध्ये केला जातो. म्हणून शरीर नीट चालण्यासाठी रक्तप्रवाह फिरता असावा लागतो त्याप्रमाणे समाजाची प्रकृती चांगली राहण्यासाठी संपत्ती फिरती राहायला हवी. तिचा संचय केला तर ती गरजूंना उपलब्ध कशी होणार ? म्हणून मिळवलेल्या संपत्तीची गुंतवणूक सतत कुठे ना कुठे केली गेली पाहिजे, यावर इस्लामचा भर आहे. माणसाने मिळविलेल्या संपत्तीतून त्याने समाजासाठी काही रक्कम खर्च करावी, असे इस्लाममध्ये म्हणण्यात आले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून आपल्या बचतीतील काही रक्कम दान करायची असते. या शिवाय स्वेच्छेने आणखी रक्कम दान करता येते. समाजाचे देणे देताना आपला कर किती कमी होईल, असा स्वार्थी विचार माणसाने करायचा नसतो, असे मत मांडले जाते.

संपत्तीची संकल्पना, तिची मालकी व तिचा योग्य विनिमय, तिचा लाभ सर्वांना कसा मिळेल याचा विचार आणि या सर्व बाबींशी अल्लाहचे असणारे नाते याबाबत इस्लाममध्ये काही संकेत आहेत. या नात्याला काही अभ्यासक Tawhid असे संबोधतात. अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून याचा पद्धतशीरपणे अभ्यासही काहींनी केला आहे. त्याच्या मते केवळ अर्थशास्त्रीय व्यवहार असे याचे स्वरूप नाही. इस्लामच्या एकूण अर्थव्यवहारात माणसांच्या नैतिक वर्तनाला बरेच महत्त्व देण्यात आले आहे. दानधर्म केलेल्या निधीचा उपयोग करून गरिबी कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशा सामाजिकदृष्ट्या काही प्राधान्यक्रमांचाही उल्लेख या संदर्भात केला जातो. प्रत्यक्षात तसे घडावे यासाठी नागरिकांचे व्यवहार धर्माला धरून असावेत, असे संकेत इस्लाममध्ये आहेत.

एकंदरीत पाहता असे दिसते की, इस्लामधर्मियांचा संपत्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोण 'सर्व काही अल्लाह'चे असा आहे. ■■

# संपत्तीची उधळण करणारा देव

'मूर्ती लहान पण कीर्ती महान' या धर्तीवर 'ग्रीस आकाराने लहान पण ग्रीक संस्कृतीचा प्रभाव महान' या एका वाक्यात ग्रीस देशाची व संस्कृतीची ओळख करून देता येईल. ग्रीकांच्या संपत्तीविषयक धारणा समजून घेताना ग्रीक संस्कृतीच्या इतिहासाच्या मूळापर्यंत जावे लागेल. ताम्रयुगातील काही जमाती (साधारणपणे इसवी सनपूर्व २०००) ग्रीसमध्ये वास्तव्यास असाव्यात असे अभ्यासकांना वाटते. मात्र ग्रीक संस्कृती नेमकी केव्हा उदयास आली असावी, यावर एकमत आढळत नाही. काही अभ्यासकांच्या मते इसवी सनपूर्व ११५०च्या सुमारास मायसेनियन संस्कृतीचे लोक ग्रीक भाषा बोलत होते. इसवी सनपूर्व ७७६ मध्ये ऑलिंपिक खेळांची सुरुवात झाल्याचे स्पष्ट झाल्यापासून इसवी सनपूर्व ९००ते ८०० या काळात ही संस्कृती उदयास आली असावी, असेही म्हटले जाते. ग्रीकांच्या या प्राचीन इतिहासाचा कालखंड चार टप्प्यांत विभागता येतो. पहिल्या टप्प्यातील काळ (इसवी सनपूर्व ११५०ते ७७६) ग्रीक संस्कृतीच्या अभ्यासकांच्या दृष्टीने Dark Agesचा ठरतो. कारण, या काळातील ग्रीक संस्कृतीबाबत नेमकेपणाने काही स्पष्ट होत नाही. दुस-या टप्प्याला (इसवी सनपूर्व ७५० ते ४८०) Archaic काळ म्हटले गेले आहे. तिस-या टप्पाला Classical (इसवी सनपूर्व ५०० ते ३२३) आणि चौथा टप्प्याला - अलेक्झांडरच्या मृत्यूनंतरच्या काळाला - (इसवी सनपूर्व ३२३ ते सनपूर्व पहिले शतक) Hellinistic असे म्हटले गेले आहे.

प्राचीन काळापासून या संस्कृतीची वाटचाल चालू होती तेव्हाच कोणत्या तरी टप्प्यावर ग्रीकांच्या मनांत देवदेवतांच्या कल्पना रुजल्या असाव्यात. त्या काळी हा समाज प्रामुख्याने शेतीवर अवलंबून होता. त्यामुळे शेतीची म्हणजे धान्याची देवता होती Demeter आणि या देवतेचा पुत्र होता Plutus. ग्रीकांनी त्याला संपत्तीचा देव म्हणण्याचे कारण 'शेतीतून मिळणारे धान्य हीच खरी संपत्ती', असे त्या काळात मानले जात असावे. कारण, संपत्तीच्या देवाने भरपूर धान्य द्यावे, हीच एक अपेक्षा Plutusकडून होती. समाजाचा विकास जसजसा होत गेला तसतसा संपत्तीचा परीघ विस्तारू लागला आणि त्यामुळे Plutus हा देवही धान्याच्या संकल्पनेपुरता मर्यादित राहिला नाही. मग तो व्यापक असलेल्या संपत्तीचा देव बनला.

संपत्तीच्या देवाचे काम हे संपत्ती वाटण्याचे असते. समोर कोण आहे हे न बघता त्याने मुक्त हस्ताने संपत्तीची उधळण करायची असते. म्हणून या देवाला नेत्रसुखच नाही, तो दृष्टीहीन आहे आणि तसा तो बाल्यावस्थेच आहे. आपल्या मातेच्या कडेवर असलेल्या या बालकदेवाच्या हाती मोत्यासारख्या दाण्यांनी भरलेले कणीस आहे. संपत्ती असेल तर माणसांच्या मनांत, घरांत आणि समाजात शांतता येईल म्हणून हा बालकदेव Eirene या शांततेच्या देवतेच्या कडेवर किंवा Tykhe या नशीबाच्या देवाच्या कडेवरही असतो. 'संपत्ती मिळणे' हा नशीबाचा भाग मानला गेला असला तरी हा बालकदेव फार प्रेमळ व उदार अंत:करणाचा आहे. त्याचा संचार सर्वत्र असतो. तो ज्याच्या हाती (कडेवर !) जाईल त्याला तो संपत्ती देईल, असे मानतात. त्यामुळे हा देव आपल्या घरी यावा अशी इच्छा अनेकजण करीत असतात. विपुलता, श्रीमंती, भरभराट, रोख रक्कम, स्थावर मालमत्ता अशा शब्दसमूहांनी युक्त असलेल्या या बालकदेवाच्या परिवारात 'शेअर्स'चाही समावेश झालेला आहे. मात्र हा देव 'शेअर' करणारा नाही. आपल्या भावाला - Philomelusला - त्याने आपल्याजवळची संपत्ती दिलेली नाही. उदरनिर्वाहासाठी Philomelusला शेती करावी लागते. दोन बैल विकत घेऊन त्याच्या शेतीची सुरुवात होते. असे का ? तर Plutus हा देव फक्त संपत्तीचा आहे. त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची वर्तणूकविषयक (म्हणजे येथे भ्रातृभावाची) अपेक्षा करायची नसते. संपत्ती ही चांगलीच असते. तिच्या ठायी कोणतेही नियम नसतात. माणसाची न्याय-अन्यायविषयक बुद्धी वा व्यवहार यांमुळे समाजजीवनांत निर्माण होणारे प्रश्न यांच्याशी संपत्तीला काही देणेघेणे नसते, असे यातून सूचित करायचे आहे. तरीदेखील चांगल्या अथवा वाईटासाठी माणसे Plutusलाच जबाबदार मानतात, हे आश्चर्याचे !

'लक्ष्मी लक्ष्मीकडेच जाते', असे म्हटले जाते. तसे Plutus बाबतही घडू शकते. कारण, श्रीमंत अधिक श्रीमंत होण्याची आणि अधिक श्रीमंत झालेल्या व्यक्ती धनाढ्य बनण्याची स्वप्ने पाहू शकतात. शिवाय, संपत्तीची उधळण करताना Plutusनेही असा विचार करायचा नसतो. तथापि, अतिरिक्त संपत्ती ही कधीकधी माणसाला आळशी, निरुत्साही वा रोगट बनवू शकते की काय असे वाटून ग्रीक संस्कृतीने आरोग्य, सौंदर्य, क्षमता या बाबी माणसांच्या आयुष्यात महत्त्वाच्या मानून संपत्तीला चौथ्या क्रमांकावर ठेवले आहे. तर कुणी माणसांच्या सद्विचारांना, आचारांना, नैतिक मूल्यांना अग्रक्रम देऊन संपत्तीला त्यांच्या मागे ठेवले आहे.

संपत्तीच्या मागे प्रसिद्धी आणि सत्ता या बाबी येतात, असे या संस्कृतीत म्हणून ठेवण्यात आले आहे. तसेच दैवदत्त वा कष्टाने मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेण्यात काही गैर नाही, असेही येथे मानले जाते. किंबहुना, संपत्ती खर्च करणे म्हणजे ग्रीकांसाठी देवाचा मान राखणे तसेच (मिळालेल्या संपत्तीसाठी) देवाप्रती कृतज्ञता दर्शविणे होय. संपत्ती लपविणे वा चोरून-लपून तिचा उपभोग घेणे हे तेथे मान्य नाही. संपत्तीचा देखावा करणे तेथे गैर समजले जात नव्हते.

संपत्तीविषयक अशा संकल्पना रुजलेल्या ग्रीकांमध्ये 'सिनिक' (Cynic) गटाचा उदय झाला (शब्दकोशात Cynic शब्दाचा अर्थ सर्व गोष्टींमध्ये काही ना काही दोष शोधणारा, नैराश्याने ग्रस्त असा आहे). हा शब्द व हा गट कसा अस्तित्वात आला याबद्दल वेगवेगळे मतप्रवाह आहेत. त्यांपैकी संपत्तीशी संबंधित मतांचा विचार येथे करणे क्रमप्राप्त ठरते. त्या काळी संपत्ती, सत्ता, आरोग्य आणि प्रसिद्धी या सर्व बाबी सोडून केवळ सद्‌गुणांना, सदाचारांना सर्वांत जास्त महत्त्व देणारा हा गट होता, असे म्हटले जाते. Cynic शब्दाचा उगम ग्रीक भाषेतील kunikos, "dog-like" (kuôn, "dog" - genitive: kunos) या शब्दापासून झाला. हा गट रस्त्यांवर भटकणारा (म्हणजे बहुधा संपत्तीहीन), सार्वजनिक ठिकाणी अयोग्य वर्तन करणारा आणि आपल्या मतांशी सहमत नसलेल्या व्यक्तींना आपल्या गटात सहभागी न करणारा किंबहुना त्यांना पिटाळून लावणारा असावा म्हणून त्यांना Cynic हे नाव पडले असावे, असे म्हटले जाते. काहींच्या मते त्या काळी ग्रीक समाजात संपत्तीचा उदोउदो होत असावा, त्यामुळे तत्कालीन समाजाला सद्‌गुणांची जाणीव करून देणारा हा गट असावा. हा गट तत्कालीन समाजापासून अलिप्त असे जीवन जगत असावा, असेही काहींनी म्हटले आहे. या गटाचे अधिकृत व विशिष्ट असे तत्त्वज्ञान सांगण्यात येत नाही, पण साधारणपणे या गटाची तत्त्वे पुढीलप्रमाणे मांडण्यात येतात.

(१) जीवनाचे ध्येय हे आनंदप्राप्ती आहे. याचा अर्थ निसर्गातून जसे मानवी जीवन उत्क्रांत झाले त्या पद्धतीने जगावे. (२) माणूस स्वयंपूर्ण असेल व आपल्या दृष्टिकोणावर (विचारांवर ?)त्याचे नियंत्रण असेल तर त्याला आनंदप्राप्ती होते. (३) सद्‌गुण, सद्‌विचार व सद्‌आचारांनी स्वयंपूर्ण बनणे शक्य आहे. (४) सद्‌गुण, सद्‌विचार व सद्‌आचारांकडे जाण्याचा मार्ग म्हणजे संपत्ती, सत्ता, प्रसिद्धी यांच्या प्रभावापासून दूर राहणे होय (कारण या बाबी निसर्गनिर्मित नाहीत. तसेच त्यांमुळे माणसे दुःखी होण्याची शक्यताच अधिक असते).

अशा काही मूल्यांचा विचार 'सिनिक' गटाने केल्याने ते निर्धन असावेत किंवा त्या काळी संपत्तीपासून वंचित राहिलेला गट 'सिनिक' बनला असेल, असे काहींना वाटते. त्यामुळे संपत्ती, सत्ता आणि प्रसिद्धी मिळालेल्या व्यक्तींवर हा गट सतत टीका करीत असावा म्हणूनही शब्दकोशातील अर्थ त्याला प्राप्त झाला असू शकेल, असा अंदाज बांधण्यात येतो. Hercules हा या गटाचा 'हीरो' आहे. असे जीवन जगण्यासाठी या गटातील व्यक्तींना सतत शारीरिक व मानसिक प्रशिक्षणाची गरज असते. कारण, चांगल्या बाबी आचरणात आणण्यासाठी मन व शरीर दोन्हीही तंदुरुस्त असावे लागते. हा गट समाजापासून अलिप्त राहणारा होता, असे म्हटले गेले. खरे तर हा गट समाजातच राहणारा पण आपल्या वेगळ्या वर्तणुकीबाबत समाजाकडून होणा-या टीकेपासून तो अलिप्त राहणारा होता, असेही म्हटले गेले आहे. या 'सिनिक' गटातील व्यक्ती स्वतःला जगाचे नागरिक समजत होत्या. काही अभ्यासकांच्या मते या गटाचा विचार पुढे नेणा-यांमधील काहींनी cosmopolitanismची (kosmopolitês) कल्पना पुढे आणली असावी.

कदाचित त्या काळचा ग्रीक समाज संपत्तीच्या आहारी गेला असेल किंवा जाण्याच्या मार्गावर असेल, म्हणून समाजातील काही विचारी नागरिकांनी समाजाला त्या मार्गाकडे जाण्यापासून रोखण्यासाठी अशी वेगळी भूमिका मांडली असेल, असेही म्हटले गेले आहे. पण याबाबत स्पष्टता नाही. कदाचित समाजाची संपत्तीविषयक धारणा नुसती चाचपून पाहण्याचा तत्कालीन नागरिकांनी केलेला हा प्रयत्न असू शकतो. काहीही असले तरी हा गट गरिबीविषयक चिंतनात अधिक बुडला होता. तसेच, पैशाने सर्व सुखे मिळतातच असे नाही, तर आयुष्यात समाधान मिळणेही गरजेचे असते, असे तत्त्वज्ञानही या गटाला समाजाला द्यायचे असावे, असे दिसते. या गटाबाबत William D. Desmond या लेखकाने The Greek Praise of Poverty: Origins of Ancient Cynicism (University of Notre Dame Press, 2006) असे एक पुस्तकही लिहिले आहे. 'सिनिक' गटाबाबत ऊहापोह करताना या पुस्तकात त्यांनी प्राचीन काळापासूनचा आढावा घेतला आहे. 'सिनिक' गट गरिबीचे कौतुक करणारा होता, ही भूमिका नवी नाही तर ते सत्य आहे, अशी विल्यम डेस्मंड यांची भूमिका आहे. श्रीमंती आणि गरिबी या संदर्भात अशी वेगळी भूमिका मान्य करणारी, ख्रिस्ती धर्मावर प्रभाव पाडणारी आणि ख्रिस्ती धर्म स्वीकारलेली ही प्राचीन संस्कृती आजही टिकून आहे. ■■

# धनलालसा अनिष्ट, धनसंचय नव्हे !

सर्व पृथ्वी आणि त्या पृथ्वीवरील सर्व संपत्ती व साधनसामग्री ही सृष्टिकर्त्या प्रभूच्या मालकीची आहे, हा ख्रिस्ती धर्मविचाराचा आणि पर्यायाने धनविचाराचाही गाभा होय. त्यामुळे, प्रभूच्या या पृथ्वीवरील मनुष्यमात्रांमध्ये प्रभूच्या लेखी अणुमात्रही भेदाभेद नाही. धनवान आणि धनहीन या दोघांनाही परमेश्वर समान प्रेमानेच पोटाशी धरतो, ही ख्रिस्ती धर्मातील शिकवण आहे. परंतु, त्याच वेळी मनुष्याची आर्थिक वा वित्तीय जीवनमूल्ये आणि मानवमात्रांच्या श्रद्धा यांची कप्पेबंद विभागणी ही ख्रिस्ती धर्मविचारास अमान्य आहे. धनसंपत्ती, धनसंचय आणि गरिबी या संदर्भात *जुन्या* तसेच *नवीन करारात* अनेक ठिकाणी निर्देश आहेत. त्याचप्रमाणे, या बाबींप्रती ख्रिस्तीधर्मियांची भूमिका कशा प्रकारची असावयास हवी, याचाही विचार वा ऊहापोह तिथे आढळतो. धनसंपत्तीस पारखे झालेल्यांप्रती प्रभूस विशेष आत्मीयता, ममत्व असल्याचे दाखले येशूने आपले जीवन व शिकवण यांच्या माध्यमातून जगासमोर मांडले, अशी ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांची धारणा आहे.

समाजातील गोरगरिबांप्रती प्रभूच्या मनात विशेष कळवळा आहे, अशी *जुन्या कराराची* शिकवण आहे. कोणत्याही समाजात दारिद्र्याचा फेरा पडलेले समूह असणारच. तेव्हा, ज्यांच्याकडे विपुल धनसंपत्ती आहे अशांनी तिचा वेच आपल्या या धनहीन बांधवांसाठी केला पाहिजे, यांवर या उपदेशाचा भर आहे. गरीब आणि श्रीमंत या उभयतांनाही प्रभूच्या राज्यात समसमान स्थान आहे, हा बायबलचा सांगावा आहे. त्यामुळे, धनसंपत्तीने युक्त असे जे भाग्यवान आहेत त्यांनी गोरगरिबांसाठी आपल्या संपत्तीचा विनियोग करत असताना हात आखडता घेऊ नये, यांवर या धर्मविचाराचा भर आहे. धन - द्रव्य अथवा संपत्तीचा संचय करण्याच्या प्रवृत्तीचा धिःक्कार ख्रिस्त करीत नाही. ख्रिस्ताचा विरोध आहे तो धनाबाबतच्या अवास्तव प्रीतीला, अपार, अनिवार धनलालसेला.

साहजिकच, ख्रिस्ती धर्मविचाराचा विशेष भर अथवा रोख हा धनार्जनापेक्षाही अर्जित धनाच्या विनियोगावरच कटाक्षाने दिसतो. आपल्याजवळील धनद्रव्याचा वापर

धनवंतांनी वंचितांच्या अभावग्रस्ततेचे निराकरण घडवून आणण्यासाठी करावा, असे या संदर्भात वारंवार बजावलेले दिसते. 'दान' हा धर्मकर्तव्यांचा एक आवश्यक भाग बनतो तो त्यामुळेच. ख्रिस्ती धर्मविचारानुसार प्रभूच पृथ्वीच्या पाठीवरील यच्चयावत संपत्तीचा धनी आहे. साहजिकच, मनुष्याकडे भूमिका येते ती त्या प्रभूच्या कारभा-याची. त्यामुळे, प्रभूने प्रदान केलेल्या धनसंपत्तीचा विनियोग हा कल्याणप्रदच होईल याबाबत दक्षता बाळगणे हे एकंदरच मनुष्यमात्रांचे आणि विशेषकरून ज्यांच्याजवळ विपुल धनद्रव्य आहे अशांचे 'प्रभूच्या संपत्तीचे कारभारी' या नात्याने कर्तव्यच बनते. धनवंतांकडून बायबलची नेमकी हीच अपेक्षा आहे. त्यामुळे, बायबलच्या शिकवणुकीनुसार धनसंचय हा गुन्हा अजिबातच नाही; परंतु, धनसंचय ही एक धोकादायक बाब मात्र निश्चितच गणली पाहिजे. कारण, संचित धनाचा विनियोग हा अ-कल्याणप्रद होण्याचा संभाव्य धोका हा असतोच असतो. अर्थविचारास नीतिविचारांचे कुंपण यासाठीच आवश्यक मानले आहे. अर्थविचार आणि धर्मश्रद्धा यांतील द्वैत ख्रिस्ती धर्मविचारास मुदलातच अमान्य असण्यामागील भूमिका ही आहे.

दानधर्म हे जरी धार्मिक कर्तव्याचे एक आवश्यक अंगच मानले गेलेले असले तरी ख्रिस्ती धर्मातील दानविचार हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. आपल्याजवळील विपुल धनाचे धनवंतांनी दान करावे, असे जरी सांगितलेले असले तरी हा दानधर्म याचकांना परावलंबी, आश्रित बनवणारा असता कामा नये, असे एक मार्गदर्शक तत्त्व त्याला जोडलेले आहे. बायबलच्या शिकवणुकीचा भर या बाबीवर विशेषत्वाने दिसतो. दानधर्माद्वारे समाजात परावलंबित्व नव्हे तर, आत्मनिर्भरता निर्माण व्हावी, अशी अपेक्षा आहे. दानधर्म करणा-या धनवंताची दानधर्मामागील भूमिका व दृष्टी अशी पायाशुद्ध असावयास हवी, यांवर बायबलचा कटाक्ष आहे. समाजातील धनवंतांनी करावयाच्या दानधर्माचा हेतू हा समाजातील उद्योजकता, स्वयंप्रेरकता, आत्मनिर्भरता यांसारख्या गुणांचा परिपोष घडविण्याचा असावयास हवा, असे आवर्जून बजावलेले आहे. या दानधर्माद्वारे अभावग्रस्तांचे सबलीकरण अपेक्षित आहे. दानधर्मामुळे समाजात निरुद्योगीपणा अथवा आळस फैलावता कामा नये, हा बायबलच्या शिकवणुकीचा सारभूत गाभा होय. जो मनुष्य अंगमेहनत करणार नाही, त्याने अन्नग्रहणही करू नये, असे बायबल सांगते.

धनसंपत्ती आणि धनसंपत्तीचा संचय हेच केवळ मानवी जीवनाचे ईप्सित नाही, ही ख्रिस्तीधर्माची प्रधान शिकवण होय. ■■

# अगाध आणि अपार धनमहिमा

एकंदर भारतीय विचारपरंपरेत व्यक्तिगत स्तरावरील धनविचार हा समष्टी स्तरावरील अर्थविषयक विचारविश्वातच अनुस्युत आहे. 'तृप्त करते ते धन' अशी धनाची व्याख्या केलेली आढळते. तीन्ही लोकांत धन हे शाश्वत राहते, असे महाभारतकारांचे प्रतिपादन आहे. 'धन' या संज्ञेची महाभारतकारांनी केलेली व्युत्पत्ती विलक्षण अर्थवाहक आहे. 'हे जगताला धारण करते आणि त्याच वेळी ते जगताकडून धारण केले जाते म्हणून याला धन म्हणतात', असे स्पष्टीकरण महाभारतात सापडते. जीवनातील सर्व व्यवहार हे धनावर अवलंबून असतात, ही धारणा भारतीय विचारविश्वात फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. धन हेच सर्व कार्याच्या मुळाशी असते, असे वचन नारदस्मृतिमध्येही आढळते. रामायण-महाभारतादी महाकाव्यांपासून ते अनेक पुराणांमध्ये अपार धनमहिमा वर्णिलेला आहे. धनावाचून पुरुष व्यर्थ, धनामुळेच पुष्कळ आप्त व मित्र लाभतात, धनवान पुरुष शूर व पंडित ठरतो कारण धनामुळेच त्याला धर्म, काम आणि स्वर्ग यांची प्राप्ती होते, अशी धनविषयक विविधांगी धारणा आमच्या परंपरेत विपुल प्रमाणात दृष्टोत्पत्तीस पडते. ही धनप्राप्ती साध्य करण्यामागील हेतू दोन - लौकिक आणि पारलौकिक. विपुल धन मिळाल्याने इहलोकी विविध प्रकारची सुखे उपभोगता येतात. तर, इहलोकी मिळविलेल्या धनामुळेच पारलौकिक सुखाचीही प्राप्ती होते, अशी पारंपरिक भूमिका आपल्या परंपरेत आहे. लौकिक धनप्राप्तीचा पारलौकिक सुखाशी असणारा हा संबंध दुपदरी आहे. परलोकवासी झालेल्या व्यक्तीला अखंड स्वर्गवास घडावा, ही तिचे श्राद्ध करण्यामागील श्रद्धा वा मनोकामना असते. आणि असे श्राद्ध करावयाचे तर त्यासाठी धन हवे, हा झाला पहिला भाग. दुसरे म्हणजे, ज्याला स्वर्गप्राप्तीची मनीषा आहे त्याने इहलोकात भरपूर दानधर्मादी पुण्यकृत्ये करावीत, असे धर्मशास्त्र सांगते. आता, दानधर्मादी धार्मिक कृत्ये यथासांग पार पाडावयाची तर त्यासाठीदेखील कडोसरीला धन हवेच !

'धन' या संकल्पनेची व्याख्याही आमच्या परंपरेत चांगल्यापैकी व्यापक आणि लवचीक आहे. पैसा, संपत्ती, द्रव्य, वित्त, सोने, चांदी, गुरेढोरे, घरदार, जमीनजुमला इत्यादींचा अंतर्भाव असलेली मालमत्ता या सगळ्याचा *(कृपया पृष्ठ ३२ पहावे)*

# असेल 'अर्थ' तर जीवनाला अर्थ !

'कहाणी' नामक वाङ्मयप्रकार वाचलेला अथवा ऐकलेलाच नाही, असा मराठीभाषक विरळाच. निदानपक्षी 'शुक्रवारची कहाणी' तरी कधीनाकधी कानावरून गेलेली असतेच. कानावरून गेलेली नसली तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्या कहाणीचा प्रत्यय प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात केव्हा ना केव्हा आलेला असतोच. 'धनवंतालागी, सर्व मान्यता आहे जगी', हे तुकोबांचे वचन सर्वार्थाने यथार्थ आहे ! आईबापदेखील, प्रसंगी, धनवान मुलाचेच शब्द प्रमाण मानतात, याचा दाखला अगदी संतसाहित्यातदेखील मिळतो. धन हे जगत्कारण असल्याने आमचा भाषिक व्यवहारही धनाने व्यापलेला असावा, यात काहीच नवल नाही. द्रव्याचे अर्जन, व्यवस्थापन आणि विनियोग या तीनही बाबींचे किती पैलू आपल्या जीवनाला किती अंगांनी भिडलेले आहेत याची कल्पना द्रव्यविषयक म्हणी- वाक्प्रचारांच्या या ठिकाणी दिलेल्या काही नमुन्यांच्या समृद्धीवरून यावी. मराठी भाषेचा एकंदरच व्यवहार दिवसेंदिवस उपेक्षित होत चालल्याने या केवढ्या भाषिक धनाला आपण पारखे होत आहोत, याची निदान कल्पना तरी यावरून यावी !

(१) **द्रव्य ज्याच्या संग्रही, त्याला सगळे जग वश होई :** ज्याच्याजवळ संपत्ती असते त्याला सर्व लोक अनुकूल असतात.

(२) **द्रव्य ज्याचे हाती, त्याची करिती भक्ती :** जो मनुष्य श्रीमंत असतो त्याची सर्वजण खुशामत करतात.

(३) **द्रव्य झाल्या गाठी, आठवती मोठ्या गोष्टी :** मनुष्याजवळ संपत्ती असली म्हणजे तो मोठमोठ्या गोष्टी करु लागतो.

(४) **द्रव्य देवतासमान, जगी मान्य :** जगात पैशाचे सर्व दास आहेत, पैशाला परमेश्वर समजतात.

(५) **द्रव्य नाही ज्याच्या पदरी, तो अर्धा दुखणेकरी :** ज्या मनुष्याजवळ पुरेसा पैसा नसतो त्याचा सर्व कारभार लंगडा पडतो.

(६) **द्रव्य असता भय प्राप्त, नसल्या दुःखव्याप्त :** ज्याच्याजवळ द्रव्य असते त्याला भीती वाटते. ज्याच्याजवळ ते नसते तो दरिद्री असल्यामुळे त्यास दुःख होत असते.

**(७) द्रव्य आणि समाधान उभयता राहता कठीण :** संपत्ती व समाधानी वृत्ती ही एकत्र क्वचितच असतात.

**(८) द्रव्य देऊन मित्र जोडे, समयीं उपयोगी न पडे :** जो मनुष्य पैशांसाठी मैत्री करतो तो वेळेवर कामास येत नाही. तो केवळ आपल्या लाभावर दृष्टी ठेवून असतो.

**(९) द्रव्य फैलावल्याशिवाय वाढत नाही :** जवळ पैसा असला तरी तो कोठे तरी व्यवहारात गुंतविल्याशिवाय त्याची वाढ होत नाही.

**(१०) द्रव्यबळ चांगले, अंगबळ पांगळे :** मनुष्याच्या स्वत:च्या अंगी कितीही जरी शक्ती असली किंवा त्याला इतरांचे कितीही साहाय्य असले तरी त्याच्याजवळ जर द्रव्य नसेल तर त्याचा काही उपयोग होत नाही. ते लुळे पडते.

**(११) द्रव्य येता मूर्खाहाती, मूर्खपणा वाढे अती :** मूर्ख मनुष्यास संपत्ती मिळली तर त्याच्या मूर्खपणाच्या चाळ्यांस ऊत येतो.

**(१२) द्रव्य वाढते, शरीर क्षीण होते :** जसजशी संपत्ती वाढत जाते तसतसे त्याच्या रक्षणाच्या वगैरे काळजीने शरीर झिजू लागते.

**(१३) द्रव्य व्यय करता येत नाही, त्याच्याजवळ द्रव्य रहात नाही :** ज्याला पैसे योग्य त-हेने खर्च करता येत नाहीत त्याच्याजवळ कितीही पैसा असला तरी तो टिकून राहात नाही.

**(१४) द्रव्यशक्ती सर्वांवरी, चालत नाही स्वर्गद्वारी :** संपत्तीमुळे सर्व गोष्टी प्राप्त होऊ शकल्या तरी तिच्या जोरावर स्वर्ग मिळविता येत नाही.

**(१५) द्रव्याचा उपभोग घेत नाही, त्यास लक्ष्मी शोभत नाही :** ज्या मनुष्यास द्रव्याचा उपभोग योग्य त-हेने घेता येत नाही त्याच्याजवळ द्रव्य असून-नसून सारखेच.

**(१६) द्रव्यापेक्षा मनी, सत्य अधिक मानी :** संपत्तीपेक्षा सत्याची किंमत अधिक मानावी, संपत्तीकरिता सत्य सोडू नये.

**(१७) द्रव्यापेक्षा विद्याधन, योग्य पुत्रासमान :** द्रव्यापेक्षा विद्या श्रेष्ठ होय व तीच शक्य तेवढी मुलास द्यावी.

**(१८) धन शहरात आणि आरोग्य देशात :** पैसा मिळवावयाचा असेल तर शहरात राहिले पाहिजे, तो खेड्यात राहून मिळत नाही. पण जर आरोग्य पाहिजे असेल तर मात्र खेड्यात राहिले पाहिजे, कारण ते शहरात मिळत नाही. ■■

(पृष्ठ २९ वरून)

समावेश 'धन' या संज्ञेमध्ये केला जातो. केवळ इतकेच नाही तर, ज्या साधनांमुळे धनप्राप्ती होते त्या साधनांचाही समावेश 'धन' या संकल्पनेमध्ये करण्याचा संकेत दिसतो. विद्याधन, कलाधन, कीर्तीधन, शास्त्रधन, गृहधन, पुत्रधन, शौर्यधन, गोधन, पशुधन, मानधन... यांसारखे व्यवहारात केले जाणारे शब्दप्रयोग याचीच साक्ष पुरवितात. व्यष्टी तसेच समष्टी जीवनव्यवहाराचे अधिष्ठान असणारी ही 'धन' संकल्पना आणि तिची व्याख्या मानवी जीवनातील उत्क्रांतीबरोबरच क्रमाने व्यापक आणि विविधांगी बनत गेल्याचे दाखले भारतीय प्राचीन वाङ्मयात विपुल प्रमाणात आढळतात.

वेदकालीन आर्यांचे समूह हे जीवनाच्या प्राथमिक अवस्थेतून पूर्णतः बाहेर पडलेले नव्हते. वैदिक ऋषींचे निकट पूर्वज हे गोपालन अवस्थेतील भटक्या लोकसमूहांचे जीवन जगणारे पशुपालक समाज होते. गाय आणि बैल हेच त्यांचे सर्वस्व होते. साहजिकच, या समूहांच्या जीवनातील सर्व व्यवहार हा 'गो' या धनवाचक शब्दाच्या साहाय्यानेच प्रचलित होता. 'गो- धन' हे शब्दरूप असे आले. आर्यकालीन समाजाच्या विविध टोळ्यांमधील संघर्षाचे कारण गोधन आणि त्या गोधनाचे स्वामित्व वा हरण हेच असे. ऋग्वेदकालीन समाजव्यवस्थेत 'अन्न' हेही 'धन'च गणले जात असे. एकंदरच समाज हा टोळीप्रधान जीवनपद्धती अनुसरणारा असल्याने समूहात वा गणात उपलब्ध असणा-या धनाचे वा अन्नाचे वाटप गणामधील सर्व सदस्यांदरम्यान करणे, हे एक मोठेच गण-कार्य समजले जाई. धनाच्या वाटणीबाबतचे अनेक उल्लेख ऋग्वेदात आढळतात, ते यामुळेच असे संशोधकांचे या संदर्भातील मत आहे. परिणामी, 'सर्व समूहात जे वाटावयाचे ते' अशीही 'धन' या संकल्पनेची व्याख्या केलेली सापडते.

आज आपल्याला कदाचित सर्वांत नवलाईची आणि मजेशीर वाटेल अशी बाब म्हणजे 'देव' वा 'देवता' या संकल्पनांचा उगमदेखील धनाच्या समूहांतर्गत वाटणीशी एके काळी होता, ही ! विशेषतः, 'भगवान' आणि 'विभक्ता' ही 'देव' या संकल्पनेची दोन उद्बोधने या संदर्भात चिंतनीय ठरतात. मुळात, अन्न हेच मुख्य धन. तेव्हा, 'अन्नरूपी धनाची वाटणी करणारा तो' या अर्थाने 'देव' या संकल्पनेला 'विभक्ता' असे विशेषण ऋग्वेदात लावलेले आढळते. त्याच न्यायाने, 'धनाचे भाग गणातील प्रत्येकाला वाटून देणारा तो' असा 'भगवान' या शब्दाचा तेव्हाचा अर्थ. 'भग' म्हणजे धन. त्याचा भाग म्हणजेही धनच. हा भाग म्हणजे देवच. धनालाच देव समजण्याची परंपरा इतकी प्राचीन आहे ! ■■

**प्रमुख संदर्भ** - (1) http://www.pbs.org/empires/thegreeks (2) http://ccat.sas.upenn.edu/bmcr/ (3) http://www.mlahanas.de/Greeks/ (4) http://ndpr.nd.edu (5) http://www.lib.msu.edu (6) http://www.pbs.org/empires/thegreeks (7) http://en.wikipedia.org (8)www.library.theoi.com (9) http://www.iep.utm.edu (10) http://www.aroundgreece.com/ancient-greece-history (11) www.opzaney.wordpress.com (12)www.thekrytoislam (13) www.islamreligion.com (14) www.islamic-world.net/economics (15) www.nd.edu/ethics/wcConference (16) www.myjewishlearning.com/daily_life/ (17) www.springerlink.com/contents/ (18) www.mfa.gov.ll
(१९) भारतीय समाजविज्ञान कोश, खंड २, संपादक- स. मा. गर्गे, समाजविज्ञान मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, १९८७, पृष्ठे ५३२ व ५३३. (२०) भारतरत्न म. म. डॉ. पां. वा. काणेकृत धर्मशास्त्राचा इतिहास; सारांशरूप ग्रंथ : पूर्वार्ध, अनुवादक - यशवंत आबाजी भट, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८०, पृष्ठ क्रमांक ३८२ ते ३९८, ४१८ ते ४२७ आणि ४३१ ते ४३४.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

# आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणा-यांना 'अर्थबोधपत्रिका' मासिक एक वर्ष विनामूल्य**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये

द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

■ **Common Wealth : Economics for a Crowded Planet, Jeffrey Sachs, Allen Lane - an imprint of Penguin Books, U. K., 2008, PP. xiii + 386, Price - Rs. 695/-**

गरिबी, वाढती विषमता, हवामानातील बदल, पर्यावरणाचा -हास आणि या सगळ्याच्या मुळाशी असणारी लोकसंख्या वाढ यांसारख्या आव्हानांना अंगावर घेत उभ्या जगभरातील मानवसमूहाने २१व्या शतकात प्रवेश केला. या सगळ्या अक्राळविक्राळ समस्यांचा सामना करावयाचा असेल तर, 'आर्थिक विकास' या संकल्पनेचा प्रचलित आशय आणि त्यावर आधारित विकासाची व्याख्याच मुळापासून तपासून बघावयास हवी, यांबाबत आज जगभरच मतैक्य होताना दिसते आहे. त्यासाठी, पर्यायी, सातत्यशील, शाश्वत विकासाची कास धरावी लागेल, असा विचारही जोमाने पुढे येत आहे. हा विचार उत्तरोत्तर मूळ धरत आहे. या विचाराला असणा-या स्वीकृतीचा परीघही दिवसेंदिवस विस्तारताना दिसतो. पर्यावरणाच्या मुळावर न उठणा-या परंतु प्रगमनशील विकासाद्वारे निर्माण होणा-या समृद्धीचा हविर्भाग प्रत्येकाच्याच पदरात घालणा-या शाश्वत विकास प्रणालीचा अंगीकार करावयाचा असेल तर आगामी काळात आमचे आर्थिक विकासविषयक चिंतन आणि त्या चिंतनावर बेतलेला कृतिकार्यक्रम कशा प्रकारचा असणे अगत्याचे आहे, याचा आराखडा विख्यात अर्थवेत्ते जेफ्री सॅक्स यांनी प्रस्तुत ग्रंथात मांडला आहे. उभ्या मानवजातीसमोरच उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा सामना करण्याबरोबरच पर्यायी विकासप्रणालींचा शोध घेत कृतिकार्यक्रम आखण्यासाठी जगातील सर्वच देशांना परस्पर सहकार्यांचे नवीन पर्वच निर्माण करावे लागेल. त्यासाठी, आपल्या शेजारील राष्ट्रांकडेच बघण्याच्या केवळ नव्हे तर, एकंदरच जगाकडे बघण्याच्या दृष्टिकोणातच आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे प्रत्येक देशाला आवश्यक ठरते. पृथ्वीतलावर उपलब्ध असणारी साधनसामग्री ही उभ्या मानवजातीची ठेव आहे आणि ती ठेव जपण्यासाठी देशोदेशीच्या लोकसंख्याविषयक, तंत्रज्ञानात्मक, पर्यावरणसंलग्न धोरणांचे सुसूत्रीकरण साधावे लागेल, या विचारव्यूहाची समग्र चौकट विशद करणे हा प्रस्तुत ग्रंथाचा विशेष होय. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**